# ह्या काळाचे चिन्ह

सर्व काही शक्य आहे, फक्त विश्वास ठेवा;
फक्त विश्वास ठेवा, फक्त विश्वास ठेवा.
सर्व काही शक्य आहे, फक्त विश्वास ठेवा.

2 आपण सर्व आता प्रार्थनेसाठी आपल्या माना झुकवू या. कृपाळू स्वर्गीय पित्या, ह्या रात्रीच्या वेळी आम्ही सर्व आनंदित आहोत कारण तू आम्हाला न्यूयॉर्कला येण्याचे भाग्य दिलेस, जेणेकरून तुझ्या नावात तुझ्या लोकांची सेवा आम्ही करावी. आम्ही आज येथल्या लोकांना भेटून खूप आनंदित आहोत कारण, उद्या असा एक दिवस येणार आहे जेव्हा आम्ही पुन्हा एकमेकांना भेटणार आहोत, तेथे आजारयांसाठी आम्ही प्रार्थना करणार नाही, कारण तेथे कोणीही रोगी असणार नाही. तेथे हरवलेल्या साठी रात्रभर प्रार्थना नसणार, कारण ते सर्व तेथे वाचविलेले असणार.

3 आणि आम्ही त्या दिवसाची वाट बघत आहोत जेव्हा येशु प्रगट होईल. ती घटका जशी जवळ येत आहे, आणि चिन्हे आणि अद्भुत्ये त्याकाळाकडे खुणावत असताना, प्रभू, ती आम्हाला क्षणभर थांबून स्वत:बद्दल विचार करण्यास प्रवृत्त करत आहे. आणि आम्ही आता हा प्रश्न विचारत आहोत, “तू आम्हाला शोध, तू आमची पारख कर, प्रभू.” आणि पित्या जर आमच्यामध्ये काही दुष्टपणा असेल तर तो आम्हा मधून काढून टाक. आम्हाला तुझी सेवा निर्मळ हृदयाने, स्वच्छ हाताने करायची इच्छा आहे, कारण आम्ही जाणत नाही की कोणत्या घटकेला तू वरून हाक देऊन आम्हाला तुझ्याकडे बोलावशील. आम्ही तुला तेव्हा भेटण्यास येऊ.

4 आज या रात्री, प्रभू, जर येथे कोणी तुला मुक्तीदाता म्हणून ओळखत नसेल, त्याच्या पापांच्या क्षमेसाठी, जर ते देवाच्या आत्म्या द्वारे जन्मलेले नसतील, तर आज रात्री त्यांना निर्णय घेण्यासाठी प्रवृत्त कर, आणि देवा त्यांना तुझ्या चांगुलपणाने भर. पित्या, येथे असलेल्या सर्व रोग्यांना व पीडितांना आरोग्य दे. आणि ही प्रार्थना सभा जेव्हा समाप्त होईल तेव्हा ह्या इमारती मध्ये कोणीही अशक्त राहू नये, पापी राहू नये. तुझ्या गौरवासाठी व तुझ्या महिमेसाठी आज हे सर्व घडू दे. ही प्रार्थना आम्ही तुझा परमप्रिय पुत्र, येशू ख्रिस्त याच्या नावात मागतो. आमेन.

5 तुम्ही सर्व खाली बसा. आज ह्या रात्री, हे माझे मोठे सौभाग्य आहे की मी त्या सुंदर रक्षणकर्त्याच्या नावात सेवा करावी जो की सर्व पूरक आहे.

6 कालच्या रात्री आम्ही ज्या प्रकारे देवाच्या दुताविषयी, व सदोमाचे चिन्ह ह्याविषयी बघितलं की कशाप्रकारे तो दूत अब्राहमाशी बोलण्यासाठी माघारी राहिला, हा मनुष्य जो की देवाचा दूत होता, परंतु तो मनुष्यरूपा मधला देव होता, कारण अब्राहामाने त्याला “प्रभू” म्हणून संबोधले. प्रत्येक बायबल वाचकांना हे माहिती आहे की प्रभु ह्या या शब्दाचा उगम कुठून आहे, “प्रारंभी *देवाने* आकाश पृथ्वी ही निर्माण केली,” ज्याचा अर्थ *एलोहिम* म्हणजेच, “सर्व पूरक असणारा, जो सर्वसमर्थ”. आणि देवाने अब्राहामाला स्वतःची ओळख मनुष्य रुपात दिली. ते एका माखलेल्या वाटसरू सारखे त्याला भासले. त्याने तू कुठून आला याविषयी काहीच सांगितले नाही. पण लक्ष द्या जेव्हा तो अब्राहामाशी बोलला तेव्हा तो म्हणाला, “मी हे करीन. हे माझे अभिवचन आहे.” बघा? आणि त्याला अब्राहाम ह्या—ह्या “पिता” दर्शक नावाने बोलाविले, जे की थोड्या दिवसा अगोदर अब्राम असे होते, परंतु आता तो अब्राहाम असा होता. आणि सारायला *सारा* म्हणजे,

"एक राजकुमारी," म्हणून संबोधले. आणि त्यानंतर देव अब्राहामा समोरून अंतर्धान पावून सदोमात गेला, आणि ते त्यांच्यासाठी शेवटच चिन्ह होतं. आकाशातून अग्नि पडून, सदोम आणि गमोरा आणि आसपासच्या सर्व नगरांचा नाश झाला.

7 ह्या द्वारे, चिन्ह रूपाने दर्शविले, की परराष्ट्रीय जगाचे काय करील. सर्व नष्ट होईल, अग्नीने नष्ट केले जाईल. देवाने आम्हाला अभिवचन दिले होते की तो परत ह्या जगाचा नाश पाण्याने करणार नाही आणि त्याने आम्हाला त्यासंबंधीचे चिन्ह दिले. देव कोणतीही गोष्ट चिन्ह प्रगट केल्याशिवाय करत नाही. आणि त्यांनी आम्हाला मेघधनुष्याच्या रूपात चिन्ह घेऊन आमच्याशी करार केला की तो परत ह्या जगाचा नाश पाण्याने करणार नाही. आणि आता ह्या वेळेला तो अग्नीने करेल.

8 आणि जशाप्रकारे येशूने ह्या काळाविषयी संबोधले, तो म्हणाला, "जसे नोहाच्या काळात घडले, जेव्हा तारू तयार होत असता, जेथे फक्त आठ जण पाण्यातुन वाचवण्यात आले, तशाच प्रकारे मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या समयी होईल." ह्या उदाहरणात असलेल्या अल्प संख्येकडे लक्ष द्या "तेव्हा असे घडले, ज्याद्वारे आठ जणांचा पाण्यापासून बचाव झाला." आणि तो पुढे गेला आणि त्या दिवसाची नैतिकता दर्शवली, "खाणे, पिणे, लग्न करणे, लग्न करून देणे." आणि जर...

9 मी ह्या गोष्टीविषयी काही समया अगोदर वाचून व टिप्पणी करून त्याविषयी प्रचार करत होतो. आणि तेव्हा माझ्या लक्षात आले की येशूने तेच उत्पत्तीचे पुस्तक वाचले जे तुम्ही वाचता. म्हणून हे शोधण्याकरता की त्या काळातील लोकांनी काय केले, मी पुन्हा उत्पत्तीच्या सहाव्या अध्यायात गेलो, तेव्हा आपल्याला दिसते की, "देव पुत्र मानव कन्यापाशी गेले." मी तेथील भाषांतर तपासले, तेथे असे म्हटले आहे, "ते स्त्रियापाशी गेले," कन्यापाशी नव्हे. हे रिनो नेवाडा येथे घडते त्याप्रमाणे आहे, घटकेत लग्न, घटस्पोट, हॉलिवुड मध्ये जसे घडते त्याप्रमाणे आहे. आणि असे म्हटले आहे, "ते पुरातन प्रतिष्ठित लोक होते."

10 त्यानंतर तुम्ही जसे *लाईफ* मासिकात बघता, की तेथे इंग्लंडमध्ये घडलेल्या मोठ्या जारकर्माविषयी वर्णन केले आहे, त्यात प्रतिष्ठित लोक आणि वेश्याविषयी आणि त्या प्रकरणात कशाप्रकारे राज्यकर्ते त्यामध्ये सामील होते. आणि, बापरे, काय हा संयोग आहे, जसे तसे चित्र येशूने म्हटले होते की असे घडेल. बघा, "आणि नोहा तारवात जाण्याच्या दिवसापर्यंत लोक कसे खात, पित, लग्न करत होते व लग्न करून देत होते."

11 आणि त्यानंतर दरवाजा बंद करण्यात आला. तेथे आणखी संधी नव्हती. तो त्याचा शेवटचा संदेश होता. कोणत्याही काळात, महान सेवकाई दरम्यान शेवटचा संदेश हा अशक्यप्राय लोकांना दिला गेला की ज्यांचा बचाव संभव नाही. अशाच प्रकारे नोहाने देखील अशक्यप्राय असे लोक, ज्यांचे वाचणे शक्य नाही अशा लोकांपुढे संदेश दिला. बघा, तो आत गेला आणि त्याच्या पाठी दरवाजा बंद केला गेला, आणि तो तेथे पाऊस पडण्याच्या सात दिवस अगोदरच आत गेला होता. बघा, त्याचा पहिला संदेश प्रचार होता, तारू बांधणे त्यानंतर सात दिवस आत मध्ये बंदिस्त रहाणे हे होतें.

12 तेथील लोक म्हणत, "तो वेडा म्हातारा बघा. तो तेथे आत आहे, व त्याने दरवाजा लावून घेतला आहे." परंतु तो देवाने बंद केला होता. तशीच गोष्ट सदोमात देखील होती.

13 आपल्या प्रभू येशूकडे बघा. जेव्हा तो ह्या पृथ्वीवर आला, तो एक गालीली संदेष्टा होता. तो सभास्थानात जात असे व सर्व लोक त्याच्यावर प्रेम करत असत. त्याने रोग्यांना बरे केले. हा त्याच्या सेवकाईचा पहिला भाग होता, पहिली पायरी होती. त्याचा दुसरा भाग भविष्यवाणी करणे होता, जेव्हा त्याने त्या काळातील परुशी व सदुकी ह्यांचा निषेध

करून त्यांना त्यांच्या वर्तनाविषयी सांगितले की कशाप्रकारे ते सर्व आंधळे आहेत व त्यांना दृष्टी नाही, आणि त्यांना सांगितले की तो कोण होता आणि बघा आणि त्यांचे भविष्यात काय होणार आहे हे सर्व सांगितले. ह्याचमुळे त्याला दोषी ठरविण्यात आले व त्याच आधारे त्याला क्रुसावर देण्यात आले, परंतु ते त्याचा संदेश थांबवू शकले नाहीत. तुम्ही संदेष्टयाला थांबूवू शकता, परंतु त्याच्या संदेशाला नाही. आणि बायबल असे म्हणते की, “तो अधोलोकात उतरला व त्याने कैदी असणाऱ्या आत्म्यांना प्रचार केला, जे सर्व कधीकाळी आज्ञाभंजक होते”; अशाप्रकारे त्याचा शेवटचा संदेश नाश पावलेल्या लोकांसाठी होता.

14 आता गंभीरतेने विचार करण्याची गरज आहे, या काळात देखील काही लोक नोहाच्या दिवसात झालेल्याप्रमाणे प्रचार करतील, ते सर्व तशाच प्रकारे करतील, परंतु नाश पावलेल्या जगासाठी दरवाजे कधीच बंद झालेले आहेत. आम्हाला माहित नाही हे कधी होणार आहे. आज रात्री तुम्ही जर ख्रिस्ती नसाल तर ह्यावर जरा गांभीर्याने विचार करा. एक गंभीर विचार करा.

15 आता आपल्याला एकच गोष्ट ठाऊक आहे जी आपण करतो ती म्हणजे देवाने आपल्याला दिलेले आदेश पाळणे, “प्रत्येक जीवसृष्टीला सुवार्ता सांगा.” तो सर्व काही जाणतो, कोण वाचला आहे व कोण वाचला नाही. आपण ते जाणत नाही. आपण समुद्रामध्ये जाळी टाकतो, ज्यामध्ये सर्व प्रकारचे जीव पकडले जातात, परंतु देवालाच ठाऊक आहे तो कोण वाचलेला आहे व कोण वाचलेला नाही, “आणि पित्याने आकर्षित केल्याशिवाय कोणीही मनुष्य त्याच्याकडे येत नाही आणि जे कोणी पित्याने त्याला दिले आहेत ती सर्व त्याच्याकडे येतील.” हे सर्व आपण जाणतो, बघा. म्हणून आपण म्हणू शकत नाही की हा *अमुक—अमुक* ख्रिस्ती आहे व *तो* नाही, कारण तो म्हणाला, “स्वर्गाचे राज्य कोणा एका मनुष्या सारखे आहे, की ज्याने समुद्रात मासे पकडण्यासाठी जाळे टाकलेले आहे. जेव्हा तो जाळी ओढतो, तेव्हा त्यात सर्व प्रकारचे जीवजंतू पकडले जातात. त्यात कोळी, कीटक, साप, मासे, घाण खाणारे मासे व चांगले मासे ही सर्व येतात.” आणि परंतु तुम्ही इथे लक्ष द्या, पाण्यातील कीटक व इत्यादी पुन्हा पाण्याकडे जातात, परंतु चांगले मासे आपल्या मालकाकडे ठेवले जातात. अशाप्रकारे आता आम्हाला ठाऊक नाही की कोण कोणत्या प्रकारचा आहे. आम्ही फक्त जाळे टाकण्याचे काम करतो.

16 परंतु हे लक्षात ठेवा की पान कीटक हा जाळे टाकण्याअगोदर पासून पान कीटक होता. सहभागीतेच्या प्रभावामुळे तो पकडला गेला. साप हा देखील सुरवातीपासून सापच होता, ज्याला सुवार्तेच्या जाळ्यात ओढण्यात आले. आणि घाण खाणारे मासे हे देखील सुरुवातीपासून घाण खात होते, कासव देखील कासवच होते, काटेरी मासे हे देखील काटेरी होते, बघा. परंतु चांगले मासे हे देखील सुरुवातीपासून मासेच होते. तर त्याला ठाऊक आहे कोण काय आहे ते, कारण त्यांनी त्यांची नावे त्याच्या वहीमध्ये लिहून ठेवली होती, हे पुस्तक जगाच्या पायारंभा अगोदर जेव्हा कोकरा वधला तेव्हा लिहिले गेले होते.

17 आपण सर्व इथे आपआपले कर्तव्य पूर्ण करण्यासाठी आलो आहोत. येथे ब्रदर विक आहेत जे एका कोपऱ्यामध्ये अनेक वर्ष जाळे टाकत आहे. दुसरे सेवक दुसऱ्या अनेक कोपऱ्यामध्ये जाळे टाकत आहे. मी आज येथे माझे जाळे तुम्हा सोबत विणण्यास आलो आहे जेणेकरून आपण एक महान जाळे टाकू शकू व ती ओढून कोळ्या प्रमाणे किनाऱ्यावर घेऊन जाऊ शकू. असा एक दिवस येत आहे की जेव्हा तळ्यातून शेवटला मासा पकडला जाईल. त्या समयी मासेमारी संपुष्टात येईल. या आपण देवाला आपल्या पूर्ण हृदयाने शोधूया, प्रामाणिकपणे प्रार्थनेत जाऊया, ती घटका जवळ येत आहे.

18 आता, या रात्री आपण आजारयांसाठी प्रार्थना करणार आहोत. आम्ही ती देणार आहोत. मी विश्वास करतो बिली...मी तुझ्याशी त्याविषयी बोललो नाही. त्याने तुम्हाला प्रार्थना पत्रे दिली आहेत काय? ज्यांना हवी आहे...हो. तुम्ही ती घ्या...चालेल. हे चांगले आहे. ठीक आहे.

19 आपण, काल रात्रीपासून, आपण आजच्या रात्री होणाऱ्या प्रार्थना सभेची तयारी करीत होतो. आणि त्यानंतर मी विचार केला की एखाद दुसरी रात्र फक्त प्रचार सभेसाठी ठेवूया. आणि आपण बघूया किती लोकांना पवित्र आत्मा मिळाला नाही. आणि हे महत्त्वाचं आहे, बघा. जर तुम्हाला—जर तुम्हाला ते मिळालं...जर तुम्ही निरोगी झाला, देव तुम्हाला खात्रीने आरोग्य देईल. त्याने ते आधीच केले आहे. तुम्हाला फक्त त्याविषयी विश्वास ठेवणे आहे. परंतु तुम्ही जर जास्त काळ जगलात तर तुम्ही पुन्हा आजारी पडू शकता, कदाचित. पण जर तुम्ही वाचविले गेले असाल, तर तो वेगळा विषय आहे, बघा. पाहिलेत?

20 आणि आता मी एका गोष्टीविषयी इथे बोलू इच्छितो कारण इथे सभेमध्ये अनेक अनोळखी व्यक्ती आले आहेत ज्यांनी आरोग्य सभा बघितली नसेल. आणि अनेक वेळा ते तुम्हाला एका शब्दाने संबोधतात, "एक दैवी आरोग्य दाता." पण तसे काही नाही... कारण फक्त एकच दैवी आरोग्य देणारा आहे तो म्हणजे देवच. आणि खरेपणाने सांगतो की फक्त एकच आरोग्य देणारा आहे, तो म्हणजे खुद्द देवच.

21 आता, कोणताही वैद्य स्वत:ला आरोग्य देणारा मानीत नाही. ते आरोग्य देऊ शकत नाही व तसे मानीत देखील नाही. यदाकदाचित मी माझा हात मोडला आणि डॉक्टरांकडे जाऊन मी जर म्हणालो, "डॉक्टर कृपा करून माझा हात तुम्ही लवकरात लवकर बरा करा, मला—मला माझे काम संपवायचे आहे"?. तेव्हा तो म्हणेल "तुला मानसिक आरोग्याची गरज आहे." पहा, हे सत्य असू शकते. बघा? आता तो वैद्य माझा सांधा बसवू शकतो, परंतु देवच आरोग्य देतो. जर मी माझा हात कापला आणि म्हणालो "वैद्यराज, माझा हात कापला आहे, लवकरात लवकर तुम्ही ह्याला बरे करा." तो ते करू शकत नाही. तो फक्त एक गोष्ट करू शकेल, साफ करू शकेल, जखम मोठी असेल, तर तो तिला शिवू शकेल; परंतु ती जखम देवच बरी करू शकेल.

22 बघा, निसर्गात पेशी द्वारे जीव उत्पन्न होतो. जीवा द्वारे ती सर्व एकत्र येतात. शरीरामध्ये जीव असून तो कॅल्शियम आणि असे इतर गोष्टी आपल्यासाठी तयार करतो. औषधे फक्त साफ करतात तर देवच आरोग्य देतो. बघा? कोणतेही औषध आरोग्य देऊ शकत नाही.

23 जर मी माझा हात कापला व इथे मृतवत पडलो. आणि जर तुम्ही मला वैद्याकडे घेऊन गेलात आणि—आणि त्याला विचारले, "काय तुम्ही ह्या माणसाला बरे कराल?"

तर तो म्हणेल, "असं का विचारता, हा तर मेला आहे."

24 ठीक आहे, मग तुम्ही म्हणता "चला आपण ह्याला शिवून घेऊया. त्याचा हात बरा करू शकेल असं काही औषध तुमच्याजवळ असेल ते लावूया, तुम्हाकडे ते नाही काय?"

"नाही, आमच्याकडे असं काही औषध नाही."

25 बघा, त्यांनी जर मला शिवून माझ्या शरीराला शंभर वर्षे पर्यंत टवटवीत ठेवणारे मसाले युक्त तेल लावून जर मला रोज पेनिसिलीन चे इंजेक्शन दिले व त्या जखमेवर मलम लावले तर ती खचितच ती जखम बरी होणार नाही. असे का? कारण त्यामधील जीवन निघून गेले आहे.

26 पहा, येथे, यामधील कोणती गोष्ट आरोग्य देऊ शकते, औषध किंवा जीवन? आता तुम्ही मला जीवन काय आहे ते सांगा आणि मी तुम्हाला देव कोण आहे हे सांगेन. बघा? देव जीवन आहे. बघा? तुम्ही सर्व...

27 काल रात्री आम्ही म्हणालो, “आपल्याकडे इथे अनेक कारागीर आहेत, पण कोणीही गतिशीलता नाही.” आता माझे शरीर हे एक यंत्र आहे, परंतु गतिशीलता देणाऱ्या आत्म्याशिवाय माझे शरीर चालू शकत नाही. बघा? आणि आत्मा माझ्या शरीराला चालवून ताब्यात ठेवतो.

28 जशाप्रकारे एखाद्या वाहनांमध्ये जर इंधन नसेल तर त्यामध्ये चल सामर्थ्य येणार नाही, बघा. मग त्यामध्ये कितीही चांगल्या प्रकारची गतिशीलता. क्षमा करा...कारागिरी कितीही चांगली असेल, इंधनाच्या टाक्या...कानू, सांधे वगैरे सर्व यथास्थित असेल, पण त्यामध्ये ऊर्जेची गरज आहे. तुम्हाला ह्या सर्व गोष्टी एकत्र आणाव्या लागतील.

29 अशाच प्रकारे देव आहे. ह्या प्रकारे जर एक विश्वासणाऱ्याचा देवाबरोबर जेव्हा सबंध येतो, तेव्हा तेथे काहीतरी घडू शकेल.

30 तर दैवी आरोग्य हे तारणासारखेच आहे. जश्या प्रकारे तारणाची सुवार्ता सांगणारा व्यक्ती स्वतःला दैवी तारणारा म्हणवू शकत नाही, पण तो ते स्वत:ला तेवढेच म्हणवू शकतो जितके की एक दैवी आरोग्याविषयी प्रचार करणाऱ्या व्यक्ती दैवी आरोग्य देवू शकत नाही. कारण, कोणीही मनुष्य दुसऱ्याला वाचविण्या विषयी बोलू शकत नाही, कारण येशूने त्याला अगोदरच वाचविले आहे. बघा? पण, तो आपल्या प्रचारा द्वारे, ख्रिस्त जो तारणारा ह्या कडे खुणावतो.

31 दैवी आरोग्य कलवरी वर पूर्ण केलेल्या कार्याकडे खुणावते, “त्याला आमच्या पापामुळे घायाळ करण्यात आले व त्याला लागलेल्या फटक्याने आम्हाला दैवी आरोग्य प्राप्त झाले.” बघा? बघा? दैवी आरोग्य ही अशी कोणती गोष्ट नाही की कोण तुम्हाला ती देवू शकतो. ती तर तुमच्या पूर्ण केलेल्या कार्याविषयीच्या विश्वासावर अवलंबून आहे.

32 जर येशु आज येथे उभा राहिला व त्याने माझ्यासारखा पेहराव केला तरी तो तुम्हाला बरे करू शकत नाही. तो फक्त...तो—तो फक्त...तुम्हाला फक्त कळेल की तो येशू आहे; पण तो तुम्हाला आरोग्य देवू शकत नाही, कारण त्याने ते तुम्हाला अगोदरच दिले आहे. बघा, तुम्हाला त्यावर विश्वास ठेवणे आहे. आता तो म्हणेल, “माझ्या पुत्रा, मला लागलेल्या फटक्याने तुला आरोग्य मिळाले आहे तुला ठाऊक नाही काय?” बघा, त्याने ते अगोदरच केले आहे. ते एक पूर्ण केलेले कार्य आहे. ते भूतकाळाविषयी आहे. आम्ही त्यावर आता विश्वास करतो. आणि माझ्यासाठी ते वचन पुरेसे आहे. जर तुम्ही कोणाला कोणती एक गोष्ट सांगितली आणि ते त्यावर विश्वास ठेवण्यास राजी नसतील तर ती गोष्ट तेथेच संपली आहे, भले त्यांनीं जावून त्यावर विश्वास न ठेवू देत. पण ते देवापासून नाही, बघा.

33 हे त्या एका लहान गीता सारखे आहे जे एका सेवक व त्याच्या पत्नीला मी गाताना ऐकले होते, “जशी विनाशी लोक क्षमा करतात, तशी नव्हे. येशु क्षमा करून विसरून जातो.” बघा? आपण विसरत नाही, बघा, पण तो विसरतो. तो देव आहे. तो विसरू शकतो, जसे की ते कधी नव्हतेच. तो ते विस्मृतीच्या समुद्रात फेकून देतो आणि त्याविषयी आठवत नाही. तो देव आहे. तो ते आपल्या स्मृती मधुन काढू शकतो. पण आपण ते करू शकत नाही, बघा. पण त्याला ते शक्य आहे.

34 आता जेव्हा तुम्ही त्यावर विश्वास ठेवता, की त्यांनी तुमच्यासाठी हे केले आहे, “त्याने तुम्हाला आरोग्य दिले आहे, त्याला तुमच्या पापा बद्दल घायाळ करण्यात आले

व त्याला लागलेल्या फटक्यांनी तुम्हाला आरोग्य प्राप्त झाले." हा भूतकाळ आहे. आता तुम्हाला एकच गोष्ट करणे आहे ती म्हणजे त्यावर विश्वास ठेवणे आहे. आता वचन हेच शिकविते. वचन असे शिकवीत नाही असे कोणी म्हणू शकत नाही. आणि हे तसं शिकविते आणि आता लोकांना आरोग्य मिळाल्याबद्दल अनेक पुरावे आपल्याकडे आहेत. पण तेथे दैवी आरोग्य आहे.

35 आता हे कोणीही असू शकतो, मी किंवा तुम्ही किंवा सार्वभौम देव ज्याने वचन पाठवले, जर लोकांना त्यावर विश्वास करायचं नसेल तर असू देत; खरे पाहता तेच आजारी आहेत. देव नव्हे.

36 त्यानेच मंडळींमध्ये प्रेषित, संदेष्टे, शिक्षक, पाळक आणि सुवार्तिक नेमून दिले ज्याद्वारे शरीराची पूर्णता त्याद्वारे होईल. आणि ह्या शरीरामध्ये, प्रत्येक स्थानिक शरीरामध्ये आत्म्याची नऊ दाने दिली. ही दाने वेगळी आहेत; ज्ञान, बुद्धी, अनन्य भाषांचे भाषांतर करणे अशा प्रकारची दाने दिली. ही सर्व दाने देऊ करून त्याने मंडळीवरचे आपले प्रेम प्रगट केले. बघा, तुम्ही ही व्यवस्थेमध्ये असावे अशी त्याची इच्छा आहे, पवित्र आत्मा स्वत: मंडळीचा महान शिक्षक आहे. ही ही खेदाची गोष्ट आहे की आपण—आपण...पवित्र आत्म्या ऐवजी बिशपना आपले शिक्षक म्हणून स्वीकारले आहे. बघा, पण पवित्र आत्मा हा देवाने मंडळीला दिलेला शिक्षक आहे जो मंडळीची उभारणी करून तिला देवाच्या अधिनतेत राखील. तर, पवित्र आत्मा मुक्तपणे ही दाने मंडळींमध्ये देतो, जर तुम्ही प्रत्येक जण उत्तेजित न होता, जर आपल्या विचारावर अवलंबून राहिला नाही तर ती सर्व दाने परिपूर्ण रित्या कार्यरत असतात.

37 बरोबर येथेच लोकं चुका करतात. मी पाहतो की काही लोक दुसऱ्यांच्या संगतीने प्रभावित होऊन थोडेसे पवित्र आत्म्याने उत्तेजित होतात. जे अद्भुत आणि उत्तेजित करणारे आहे. पण तिथे काही लोक तुम्हा कडे येऊन सांगतील, "काय प्रभू *अमुक–अमुक* म्हणतो काय?"

बघा, तुम्हाला—तुम्हाला त्यांना काहीही उत्तर देण्याची गरज नाही. जोपर्यंत देव असे म्हणत नाही, तोपर्यंत तुम्ही म्हणू नका, तेव्हा तुम्हाला **प्रभू परमेश्वर असे म्हणतो** हे प्राप्त होईल. मग कोणतीही गोष्ट घडण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. ती गोष्ट घडणारच.

38 आज रात्री मी कोणाशी पैज लावू शकतो, पण काय तुम्ही कधी पवित्र आत्म्याला सभांमध्ये **प्रभू परमेश्वर असे म्हणतो** बोलताना ऐकले आहे काय व जे जे काही बोलले होते ते तसेच घडले काय, हो घडले, दहा लाख वेळा घडले. बघा, ते पूर्णपणे खरे असले पाहिजे.

39 जर आजच्या रात्री पवित्र आत्मा माझ्यावर येऊन मला दृष्टांत दिला व सांगितले, "तुला उद्या राष्ट्राध्यक्षांच्या दफनभूमीत गेले पाहिजे कारण मी जॉर्ज वॉशिंग्टनला उठवणार आहे," तर मी मी संपुर्ण जगाला ते पाहण्यासाठी आमंत्रित करेन. तेथे ते घडणारच, पहा, कारण ते ते पवित्र आत्म्याने विधीत केले आहे. त्यामुळे ते सत्य आहे.

40 पण त्याने तुम्हाला काहीही प्रगट करे पर्यंत तुम्ही थांबा, तुम्हाला कळले. बघा, तुम्ही हे जाणता की तुम्ही वाचले आहात आणि त्याच्या चांगुलपणाने भरलेले आहात. आणि तुम्हाला ठाऊक आहे की, जर तो तुम्हा मध्ये असेल, तर त्याची कृत्ये तुमच्या जीवनातून प्रगट होतील. ह्या गोष्टीविषयी तुम्ही समाधानी असा. ह्याला तुमचा वापर करायचा आहे, व तो ते करीलच, बघा. तो तुमची स्थिती जाणतो.

41 आणि मला असं वाटते की, ह्या गोष्टी जर आपण एकमेकाशी प्रेमाने व सहभागीतेने करू, जर आपण हे सर्व विभाग, संप्रदाय आणि बंधने विसरू, तर देवाचे हे महान सैन्य विजयाकडे कूच करेल.

42 आज रात्री मी शास्त्रलेखातून लहानसा भाग वाचू इच्छितो, आणि जर तुमची इच्छा असली तर तुम्ही माझ्यासोबत वाचू शकता. तुमची इच्छा असेल असं का, तुम्ही ही खचित वाचू शकता. आणि आता आम्ही संत मत्तयकृत पुस्तकाच्या बाराव्या अध्यायाकडे वळूया, जर तुमची इच्छा असेल तर माझ्यासोबत वाचा. संत मत्तय ह्याचा बाराव्या अध्यायातील अडतिसावे वचन असे म्हणते.

43 आणि मी आता माझा आजचा विषय जाहीर करू इच्छितो: *ह्या काळाविषयी देण्यात आलेले चिन्ह*. हा शास्त्र भाग तुम्हाला थोडासा परिचित असा आहे, आणि मी हे बोलत असताना ह्याविषयी प्रार्थनेत होतो. आणि मला जड प्रचार करून पुन्हा त्या गोष्टीकडे पुन्हा यायचं नाही. कारण तुम्ही सर्व जाणता की पवित्र आत्म्याची दाने विशिष्ट माध्यमातून काम करतात. "ज्याप्रमाणे एकाच आत्म्याने, रोगमुक्त करण्याचे दान आहे, त्याच आत्म्याने अनन्य भाषा बोलण्याचे दान देखील आहे," हे एक वेगळं माध्यम असून तुम्ही स्वत:ला एका माध्यमातून दुसऱ्यात खेचून नेता. आपण आता वाचू या. जर तुम्ही...

> *तेव्हा शास्त्री व परूशी ह्यांच्यापैकी काही जण त्याला म्हणाले, गुरूजी, तुमच्या हातचे चिन्ह पाहावे अशी आमची इच्छा आहे.*
>
> *त्याने त्यांना उत्तर दिले, दुष्ट आणि व्यभिचारी पिढी चिन्ह मागते, परंतु योना संदेष्टा ह्याच्या चिन्हावाचून तिला दुसरे चिन्ह मिळणार नाही, तिला दुसरे चिन्ह मिळणार नाही*.
>
> *कारण जसा योना तीन दिवस व तीन रात्री मोठ्या माशाच्या पोटात होता तसा मनुष्याचा पुत्र तीन दिवस व तीन रात्री पृथ्वीच्या पोटात राहील.*
>
> *निनवेचे लोक न्यायकाळी ह्या पिढीबरोबर उभे राहून हिला दोषी ठरवतील, कारण त्यांनी योनाच्या उपदेशावरून पश्चाताप केला; आणि पाहा, योनापेक्षा थोर असा एक येथे आहे.*
>
> *दक्षिणेकडची राणी न्यायकाळी ह्या पिढीबरोबर उठून हिला दोषी ठरवील; कारण ती शलमोनाचे ज्ञान ऐकण्यास पृथ्वीच्या सीमेपासून आली; आणि पाहा, शलमोनापेक्षा थोर असा एक येथे आहे.*

44 आपण वाचलेल्या शास्त्र भागात येथे आपण पाहतो की प्रभूचा कल यहुदी लोकांच्या विश्वासाच्या बाजूनी आहे. यहुदी लोक चिन्हावर विश्वास ठेवत असत. तेथे काही तत्वज्ञानी लोक येशू कडे येऊन त्याच्याशी वार्तालाप करून त्याच्या कडून काही चिन्ह बघण्याची अपेक्षा करू लागले. आता तुम्ही बघता की ते किती आंधळे होते? त्याने त्यांना त्याचे चिन्ह आधीच प्रगट केले होते की तो मसीहा होता.

45 काल संध्याकाळी आपण येथे जमलो होतो. तुमच्यापैकी किती जण काल येथे होता? आपण बघूया. हे चांगले आहे. ठीक आहे.

46 काल संध्याकाळी आपण इथे असताना, येथे जमलेल्यांना हे सिद्ध करून दाखवले होते की मसिहाचे चिन्ह कश्याप्रकारे त्याने दाखवले, की तो तोच संदेष्टा होता ज्याच्या विषयी मोशेने भविष्यवाणी केली होती की तो उठेल. "आणि जो कोणी ह्या संदेष्ट्यावर विश्वास करणार नाही त्याचा स्वजनांतून उच्छेद होईल. प्रभू परमेश्वर तुम्हा मधून माझ्यासारखा एक संदेष्टा उठवील." आणि जेव्हा त्याने प्रत्यक्षात येऊन संदेष्ट्याचे

चिन्ह दाखवले, बघा, कित्येक जण त्याला बालजबुब किंवा दुष्ट आत्मा म्हणून म्हणू इच्छित होते.

47 आणि तो त्यांना म्हणाला, “आता तुमचे ह्या कृत्यांविषयी तुम्हाला क्षमा होईल. परंतु जेव्हा पवित्र आत्मा येईल, तेव्हा जर तुम्ही त्याची कृत्ये करणाऱ्याविरुद्ध काही बोललात, तर तुम्हाला त्याविषयी कदापि क्षमा होणार नाही, या जगात किंवा येणाऱ्या जगात देखील नाही.”

48 आता आम्ही या गोष्टीकडे वळत असताना ते सहजतेने घेऊ नये, पण आपण त्याकडे प्रामाणिकपणे पाहूया. येशुने एक विधान केले की जेव्हा पवित्र आत्मा येऊन त्याच्यासारखीच कृत्ये करील, व जर कोणी त्याविरोधात शब्द उच्चारील, तर त्याविषयी त्याला कदापि क्षमा होणार नाही, या जगात किंवा येणाऱ्या जगात देखील नाही.

49 आता लक्ष द्या की पेंटेकॉस्टच्या दिवसापर्यंत पवित्र आत्मा देण्यात आला नव्हता. आणि यहुदी लोकांनी तर येशू ख्रिस्त ह्या माणसाला पाहून त्याविषयी साक्ष दिली होती. शोमरोनी लोकांनी देखील येशू ख्रिस्ताला मनुष्य रूपात पाहून त्याविषयी साक्ष दिली होती. तर एक न्यायी देव, न्यायी लोकांना दोषी कसे काय ठरू शकेल, तेथे देवाला दोषी ठरवण्यासाठी दोषी लोक हवे होते. बघा, आता, हा पवित्र आत्मा ह्या शेवटच्या दिवसात मंडळीवर उतरून तीच चिन्हे जी त्याने केली होती करणे अगत्याचे आहे, कारण देव आपले मार्ग कधीच बदलत नसतो.

50 देव कधीच एक गोष्ट *एका* प्रकारे व दुसरी गोष्ट दुसऱ्या प्रकारे करत नसतो. बघा, त्याचा पहिला निर्णय हाच परिपूर्ण असतो कारण तो देव आहे. येथे बघा? त्याचे वचन बदलले जाऊ शकत नाही. त्याने सहा हजार वर्षात मनुष्यजातीच्या इतिहास पेक्षा जास्त अभ्यास केला नाही. तो त्याने आपण आधी केलेल्या कोणत्या ही कृत्यांतून त्याला शिकावे लागले नाही कारण तो मुळातच असीम आहे. बघा? आणि तो आपले—आपले—आपले—आपले वचन कधी बदलत नसतो. त्याला…

51 त्याने मनुष्यांना वाचवण्यासाठी एका निर्दोष माणसाला रक्त देण्यासाठी निवडले. आपण त्यांना शिकवण्याचा प्रयत्न केला, आपण त्यांची संप्रदायामध्ये विभागणी केली, पण जगातील सर्व गोष्टी विषयी प्रयत्न केला, आणि सामाजिक जीवनाविषयी आणि ते सर्वकाही व्यर्थ गेले आणि जर आपण रक्ताखाली आलो नाही तर यापुढेही व्यर्थ जाईल. तीच फक्त एक जागा आहे जेथे सहभागिता होते.

52 देव बदलत नाही. देव जेव्हा कोणतीही गोष्ट बोलतो, ती सर्वकाळ राहते. जर देव… जर कोणी मनुष्य देवाकडे आला व देवाने त्याला त्याच्या विश्वासाच्या आधारे बरे केले तर त्या दुसऱ्या मनुष्याला तशाच प्रकारे बरे करणे क्रमप्राप्त आहे, नाहीतर तो पहिल्याला बरे करून चुकीचा ठरेल. जर त्याने एका मनुष्याला रक्ताद्वारे वाचवले आणि त्याद्वारेच आणि दुसऱ्यांना शिक्षण यामुळे किंवा त्याच्या तत्वज्ञानामुळे रक्त लावल्याशिवाय वाचविले, तर त्याने पहिल्या रक्ताची गरज सांगून चूक केली. बघा, त्याला सर्वदा सारखेच राहिले पाहिजे. त्याचा मूळ उद्देश हा सर्वदा सारखाच आहे. त्याची कृत्ये देखील सर्वदा सारखीच आहेत.

53 कोणत्याही काळात देवाने कोणत्याही संघटनेशी व्यवहार केला नाही. तुम्ही इतिहास तपासून बघा. तो सर्वदा एका व्यक्तीशी व्यवहार करतो, कोणत्या गटाशी नाही, एकाच व्यक्तीशी. आपण इतिहासात हे बघतो की जेव्हा देवाने अनेक थोर व्यक्तीनां पाठवून उभे केले आणि कालांतराने जेव्हा हे थोर व्यक्ती निघून गेले तेव्हाच त्यांच्या मागे ते अनेक संघटना सोडून गेले. आणि या आधी असा कोणताच काळ नव्हता जेव्हा लोक एकत्र येऊन संघटित झाले होते परंतु या सर्व संघटना कालांतराने मृत पावल्या आणि

पुन्हा कधी आपल्या अगोदरच्या आत्मिक अय्यामात पोचल्या नाहीत. मी—मी असाच वीस वर्षाआधीचा बायबलचा इतिहास तपासत होतो, त्यामध्ये मला एकही असा उल्लेख सापडला नाही ते पुन्हा उठले आहेत.

54 देव प्रत्येक दिवसागणिक आपल्याशी व्यवहार करतो. तो उद्या काय करणार आहे हे त्याच्यात हाती आहे. आणि तो आपल्याशी जेव्हा जेव्हा व्यवहार करतो, तेव्हा तो एकाच व्यक्तीसोबत करतो, बघा, कारण गटामध्ये अनेक विचार असू शकतात.

55 पाहा, प्रेषितांच्या काळात यहुदाच्या पतनानंतर त्याच्या जागी नव्या प्रेषिताची नेमणूक करते वेळेस त्यांनी हाच प्रयत्न केला होता, त्यांनी चिठ्ठ्या टाकल्या व त्यातून मत्थियाची चिठ्ठी निघाली. हातात स्वर्गाच्या राज्याच्या किल्ल्या असताना हा त्यांचा उत्तम प्रयत्न होता. त्याच्या निवडीनंतर त्याच्या कार्याबद्दल शास्त्र लेखात कुठेच उल्लेख सापडत नाही. पण देवाने शोलाला निवडले, जो एक रागीट व्यक्ती होता, आणि त्याला एक दिवस त्याच्या पाठीवरून लोटून द्यावे लागले व—व काही काळ घालवावा लागला. आणि तो म्हणाला, "त्याला माझ्या नावासाठी किती दु:खसोसावे लागेल हे मी त्याला दाखवीन." बघा? पाहा, मंडळीने मत्थियाला निवडले, पण देवाने पौलाला निवडले. पाहा, हाच तो फरक आहे. देव आपली निवड व पाचारण सर्वदा स्वतःच करतो. देव आपली निवड आपल्या पूर्व ज्ञानानुसार करतो.

56 आता मी बघतो देव आपल्या लोकांशी चिन्हे आणि अद्भुत यांच्याद्वारे व्यवहार करत होता. त्यांनी आम्हाला अंतिम काळाच्या चिन्हाविषयी अभिवचन दिले आहे. देव आपले धोरण कधी बदलत नाही. तो सर्वदा संदेष्टयाद्वारे आपल्या लोकांशी संवाद साधतो. अनेक युगे व काळ होऊन गेले, पण देवाने प्रत्येक ठिकाणी आपला संदेष्टयाला पाचारण केले ज्याद्वारे तो प्रत्येक जनाशी, देवाच्या वचना विषयी बोलू शकेल, ते वचन नेहमी संदेष्टयाकडेच येत असे. पाहा?

57 ते प्रत्येक वेळेला जाऊन देवाच्या संदेष्टयाविषयी शोध घेत. आता एक *द्रष्टा*—एक *द्रष्टा* ह्याचा अर्थ होतो, "पुढे घडणाऱ्या गोष्टी विषयी आत्ता सांगणे," एक द्रष्टाच पुढे घडणाऱ्या गोष्टीविषयी सांगू शकतो. आणि तो त्या विषयी लोकांना अनुमान सांगत असे. आणि पवित्र शास्त्र असे सांगते, "जर त्यांनी सांगितलेल्या गोष्टी घडल्या नाहीत तर तुम्ही त्याचे ऐकू नका." ते तुम्ही प्रत्येक काळामध्ये करा. देव कधी असफल होत नाही, पहा. "आणि जर त्यांनी सांगितलेल्या गोष्टी घडल्या नाहीत," तर तो म्हणाला, "तो (देव) त्याच्या बरोबर नाही." अशावरून लोकांना हे ठाऊक होते की देवाचे वचन द्रष्टयाकडे येत असे, सर्व जुन्या करारातील द्रष्टयाकडे.

58 आता पवित्र आत्मा आपला कल कधी बदलत नसतो. येशू म्हणाला, "जेव्हा तो पवित्र आत्म्याच्या रुपात तुम्हावर उतरेल, तो तुम्हाला सर्व गोष्टी प्रगट करील व मी तुम्हाला शिकविले आहे, मी तुम्हाला सांगितले आहे आणि तो तुम्हाला घडणाऱ्या गोष्टी विधीत करील." पहा, तो आपली प्रणाली कधी बदलत नसतो, ती सर्वदा सारखीच आहे आणि म्हणून आपण पण त्याच्यावर आत्मविश्वास ठेवू शकतो.

59 परंतु, तुम्ही पहा, आपण आपल्या शारीरिक अवयवांमध्ये अनेक गोष्टीविषयी गुंतून जातो, आणि अनेक माणसे आपल्यासाठी गट बनवून *ह्या* आणि *त्या* गोष्टीविषयी निवडणूक घेतात. हीच गोष्ट आपल्याला सरळ मार्गातून बहकविते, पहा आणि ते म्हणतात, "हे, दुसऱ्या काळाविषयी सांगितले आहे." नाही. तो काल, आज व युगानयुग सारखाच राहतो. आणि त्याचे प्रत्येक वचन हे प्रेरित असते, सर्व वचने.

60 आता पाहा, येशू देखील त्याच्याविषयी दिलेल्या चिन्हाप्रमाणे प्रगट झाला, ज्याप्रमाणे मोशेने भविष्यवाणी केली की येणारा मसिहा हा अभिषिक्त संदेष्टा असेल ज्याला देव उठवील, आणि त्याने स्पष्टपणे सांगितले की तो एक संदेष्टा असेल. आणि आता परुशी लोक त्याच्याकडे येऊन त्याला म्हणाले, "गुरुजी आम्हाला तुमच्याकडून चिन्ह हवे आहे."

61 एके ठिकाणी तो म्हणाला, जर तुमची वाचण्याची इच्छा असेल तर, संत मत्तयकृत शुभवर्तमान ह्याचा सोळावा अध्याय आणि तिसरे वचन, एक ते तीन, त्यांनी त्याला इकडे पुन्हा चिन्हाविषयी विचारले. आणि तो म्हणाला, "हे आंधळ्या परुश्या, ढोंग्या, तू बाहेर जाऊन बघतोस की सूर्य मावळत आहे," आणि तु—तु म्हणतो, 'उद्या उघाड होईल.' जर आकाश थोडेसे तांबूस असेल तर म्हणतोस की वातावरण चांगलं असणार नाही." तर तो म्हणाला, "अहो ढोंग्यांनो, ज्या तुम्हाला आकाशातील चिन्हे समजतात, त्या तुम्हाला काळाची चिन्हे का समजत नाहीत." ती त्यांना समजायला हवी होती.

62 आता, आता जर पवित्र आत्मा ह्या अंतिम काळात उतरणार असेल तर ख्रिस्ताचे जीवन मंडळीतून प्रगट झालं पाहिजे, पाहा, आणि त्यावर जग हसेल किंवा त्यांच्याविषयी काही बरे वाईट बोलेल, त्या सर्वांचा देवाच्या वचनांचा अधिकाराने नाश केला जाईल. तर तुम्ही बघता, जगाने काय केले आहे, तर आता देवाने स्वर्गातून जगावर न्याय वर्षिणे हे घटनाक्रममाप्रमाणे अगत्याचे आहे. आपला देश, आपले शहरे, आपले जग, न्यायासाठी परिपक्व झाले आहेत.

63 आणि मला खात्री आहे की हे सर्व आपल्या अपेक्षेच्या नंतर आहे. तो म्हणाला मला तो काळ निवडलेल्यांकरिता कमी करावा लागला नाहीतर तिथे एकही देह वाचला नसता.

64 जरा विचार करा आणि बघा, दिवसेंदिवस, वर्षामागे वर्ष, गोष्टी बिघडत आहेत. होलीनेस पंथाच्या लोकांनो, अहो पेंटेकॉस्टल लोकहो, आपल्या स्वतःकडे बघा, मंडळयांमध्ये सर्वत्र भ्रष्टाचार कशाप्रकारे पसरला आहे, कशाप्रकारे गडबड गोंधळ चालू आहे.

65 आपल्या स्त्रियांकडे पहा. स्त्रियांनी केस कापणे हे एकेकाळी चुकीचं होतं, पवित्र शास्त्र म्हणते, "ते चुकीचे आहे." पण आता ते केस कापत आहेत. बायबल म्हणते की त्यांनी ते करू नये. आणि पुरुष सदृश्य असे कपडे करणे हेसुद्धा, बायबल असे म्हणते, "ही कृत्ये देवासमोर अमंगळपणा आहे."

66 "अहो" तुम्ही म्हणता, "हे मेथडिस्ट पंथाचे आहेत," हे पेंटेकॉस्टल पंथाचे आहेत, तुम्ही बरोबर ओळखलं, ते सर्व अशामध्ये आहेत, पहा.

67 हे असे का आहे? कारण तुम्हाला बायबल वाचण्यापेक्षा दूरचित्रवाणी वरील कार्यक्रम जास्त पसंत आहेत. पहा, तुम्ही—तुम्ही देवाच्या वचनाऐवजी त्यामधील लोकांना आपले उदाहरण बनवले आहे. पहा? तर आता न्याय येणार आहे आणि हे सर्व दिवसेंदिवस वाईट अधिक वाईट होणार आहे.

68 आता येशू त्यांना म्हणाला की एक चिन्ह प्रगट होईल. तो शेवटल्या दिवसातील चिन्हांविषयी बोलला. आणि काल रात्री तो आपल्याशी बोलला, "जसे सदोमाच्या दिवसात घडले, तसेच मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या दिवसात घडेल, आणि अंतिम काळात देवाचा आत्मा मनुष्याच्या देहा मधून प्रगट केला जाईल आणि त्याद्वारे तो मनातील आणि हृदयातील विचार ओळखू शकेल."

69 आता बायबल असे म्हणते देवाचे वचन देखील अशाप्रकारे करते, इब्रीकरास पत्र ४था अध्यायामध्ये असे म्हटले आहे, "कारण देवाचे वचन सजीव, सक्रिय, कोणत्याही दुधारी तलवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्ञा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे."

70 ह्याच कारणामुळे, येशु वचन होता. "प्रारंभी," योहानकृत शुभवर्तमान अध्याय 1, "प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. शब्द देही झाला व त्याने आमच्यामध्ये वस्ती केली." या कारणामुळेच तो त्यांच्याकडे बघून यांचे मनामधील विचार जाणू शकत होता.

71 हयाच कारणामुळे तो विहिरीवरील आलेल्या त्या स्त्रीला म्हणू शकला, की, "तुला पाच पती आहेत."

72 याच कारणामुळे जेव्हा फिलीप नथनेलला घेवून आला, तेव्हा तो नथनेलला म्हणाला, "पाहा, हा खराखुरा इस्त्राएली आहे; ह्याच्या ठायी कपट नाही!"

तेव्हा तो म्हणाला, "आपणाला माझी ओळख कोठली?"

73 तो त्याला म्हणाला, "फिलिप्पाने तुला बोलावण्यापूर्वी तू झाडाखाली होतास, तेव्हाच मी तुला पाहिले."

74 तो मनातील विचारांची पारख करणारा होता, बघा, शास्त्रलेखात त्याने स्वत:ला असे अनेकदा प्रकट केले! हे परराष्ट्रीय लोकांसाठी नव्हतं. त्याने एक वेळी सुद्धा परराष्ट्रीय लोकांसमोर स्वतःला अशाप्रकारे प्रकट केले नाही. तुम्ही शास्त्रलेखात शोधून पहा. एक वेळेला देखील नाही. तशाच प्रकारे आज आहे. पहा? परराष्ट्रीय लोकांकडे अभ्यास व तत्वज्ञान शिकण्यासाठी दोन हजार वर्षाचा काळ होता, त्यांनी परराष्ट्रीय लोकांमधून आपल्या नावासाठी लोक निवडले आहेत, परंतु आता असा समय आला आहे की सदोमाप्रमाणे जळविले जाण्या अगोदर हे सर्वकाही केले पाहिजे.

75 आता येथे येशु खुद्द एक दाखवलेले, प्रकट केलेले व शास्त्र लेखातील चिन्ह म्हणून त्यांच्यापुढे उभा होता, तरी पण यहुदी लोक त्याला सांगत होते, "आम्हाला तु काही चिन्ह दाखव."

76 तुम्ही कधी अविश्वासणाऱ्या लोकांना तुम्हाला अशाप्रकारे म्हणताना ऐकले आहे काय, "असा कोणी असेल तर, मी *अमुक-अमुक* रस्त्यावर असा कोणी आहे त्याला ओळखतो जो ह्याला बरे करील!" बघा?...ते हे आहे—ते हे आहे...तुम्ही पाहता की ते सैतानापासून आहे, अशाच प्रकारे.

77 तुम्हाला ठाऊक आहे ते म्हणाले, "जर तू देवाचा पुत्र आहेस तर तू क्रुसावरून खाली उतर." त्यांनी त्याच्या डोक्याभोवती चिंध्या बांधल्या आणि म्हणाले, "हा मनुष्य स्वतःला संदेष्टा समजतो," त्यांनी त्याच्या डोक्यामध्ये काठीने मारून व त्याच्या तोंडावर चिंध्या बांधून ते त्याला म्हणाले, "आता भविष्यवाणी करून आम्हाला सांग तुला कोणी मारले," अशाप्रकारे ते काठी एकमेकाकडे देत म्हणत होते, "तर आम्ही तुझ्यावर विश्वास ठेवू."

78 परंतु, इथे पहा, देव कोणाही साठी विदूषक बनत नाही. येशू म्हणाला, "जे काही मला पिता दाखवतो तेच मी करतो." पहा? आणि तेच खरं आहे.

79 आणि तेच देवाचे खरे सेवक आहेत, जे सर्वदा आपल्या मालकाच्या प्रति आज्ञाधारक असतात. पहा? कोणाला दाखवण्यासाठी, किंवा—किंवा कोणाला खुश करण्यासाठी नव्हे परंतु ज्याने त्याला पाठवले त्याच्याशी पूर्ण प्रामाणिक आणि सत्यतेने वागणे. अशाप्रकारे वागणाराच ख्रिस्ताचा खरा सेवक आहे.

80 जशाप्रकारे एलीयेझर हा अब्राहामचा एक प्रतिनिधी होता, जो की—की इसहाकासाठी पत्नी शोधण्यासाठी गेला, की सुंदर रिबका. एक आज्ञाधारक, नमुना असा सेवक, पहा, तो फक्त आपल्या मालकाची चाकरी करत होता. हे आजच्या काळाच्या पवित्र आत्म्याचे रूपक आहे, तशाच प्रकारे, एका वधूला शोधण्यासाठी, पहा, या संध्याकाळच्या समयी अंधुक प्रकाशामध्ये.

81 आता त्यांना एक चिन्ह पाहण्याची इच्छा होती. जरी त्याला त्यांनी ओळखून पवित्र शास्त्रामधील चिन्हाद्वारे पूर्णपणे दर्शवण्यात आले होते, तरी त्यांचा बायबल मधील या चिन्हावर विश्वास नव्हता. त्यांची इच्छा होती ती त्याने काहीतरी विदुषकीपणा करून दाखवावा. काय तुम्ही पाहत नाहीये? अशाच प्रकारचा आत्मा जो म्हणाला, "जर तू देवाचा पुत्र असशील, तर या धोंड्यापासून भाकर व्हावी अशी आज्ञा कर. जर तू देवाचा पुत्र असशील तर इथून उडी टाक, कारण असे लिहिले आहे की तुझ्या पायांना धोंड्याची ठेच लागू नये म्हणून तो आपल्या देवदूतांना पाठवील, ते तुला आपल्या हातावर झेलून धरतील." पण त्याने आपला पाय दगडावर आपटला नाही. पहा? नक्कीच. आणि तो असं पण म्हणाला होता, तुमच्या लक्षात आलं असेल, जेव्हा त्याने त्याला क्रुसावर दिले आणि तद्नंतर, तोच आत्मा तेव्हा परुशयामधून बोलत होता, "आम्हाला चिन्ह दाखीव."

82 तो म्हणाला, "दृष्ट व व्यभिचारी पिढी चिन्ह मागते." लक्ष द्या.

83 आणि त्याने, देवाने प्रत्येक युगात आपल्या लोकांना चिन्ह विदीत केले. आणि काही करण्याअगोदर, देव चिन्ह प्रकट करतो, सर्वदा तो चिन्ह अगोदर पाठवतो. आणि त्याने अभिवचन दिल्याप्रमाणे तो तशाच प्रकारे करील, कारण तो कधी बदलत नाही. तर आता आपण बघतो की जसा अंतिम काळ जवळ येत आहे, आणि अंतिम काळाची चिन्हे दिसू लागल्यावर, एकदम शेवटचं चिन्ह देखील सदोम जळण्या अगोदर देण्यात आलं होतं.

84 आम्ही आनंद बघितला आहे. आम्ही आकाशात ताऱ्यांना हलविले जाताना बघितले आहे. आम्ही अनेक युद्धे बघितली व युद्धाच्या अफवा ऐकल्या आहेत. आम्ही अनेक ठिकाणी भूमीकंप व त्या सारख्या गोष्टी बघितल्या आहेत. आणि आता जेव्हा आत्म्याची दाने मंडळीकडे पुन्हा आलेली आहेत. आता आपल्याकडे अनेक प्रकारचे प्रकट होणे, अनेक रोगमुक्ती सभा आणि अशा अनेक गोष्टी आपण बघितल्या आहेत. ही सर्व चिन्हे आहेत.

85 परंतु शेवटचं चिन्ह, जे परराष्ट्रीयांना जाळण्या अगोदर देण्यात आले, ते हे चिन्ह होते; जेव्हा देव स्वतः मनुष्य रूपात प्रकट झाला. बरोबर आहे. आणि येशू म्हणाला हे त्याच्या परतीच्या दिवसात होईल. आता आपल्याला अधिक काळजी घेऊन देवाबरोबर आपले संबंध सुधारण्याची गरज आहे. आता

86 तुम्हाला हे माहित आहे की यहुदी लोक तत्त्वज्ञान व भाषणे ऐकण्याऐवजी प्रत्येक वेळेला चिन्हावर अवलंबून राहत असत. त्यांना चिन्हावर अवलंबून राहणे गरजेचे होते, कारण प्रत्येक खरा विश्वासी हा विश्वास करतो कि देव हा सामर्थ्याचा देव आहे.

87 आणि जेथे देव आहे, तेथे चिन्हे घडलीच पाहिजे. तुम्ही पहा, हे अशाच प्रकारे आहे जशा प्रकारे आगीत निळसरवर, तापलेले गरम लोखंडा भोवती अंगारे असतात. ते आपल्याला प्रकट करते. आणि प्रत्येक ठिकाणी तेथे देव असतो, तेथे चिन्हे व अद्भुते देखील असतात. येशू म्हणाला, "विश्वासणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असतील," संपूर्ण जगभरातील सेवकाईत, पाहा. "ही चिन्हे त्यांच्या मागे येतील," प्रत्येक वेळी चिन्हे. देव सर्वदा चिन्हे देत असतो, जशा प्रकारे त्याने उत्पत्तीच्या वेळी दिली, तशाच प्रकारे प्रत्येक पिढीच्या लोकांना दिली, आणि आता अंतिम काळातदेखील देत आहे.

88 त्याने तेव्हाच्या काळात देखील अशाच प्रकारे केलं. नोहा हा त्या पिढीसाठी चिन्ह होता. तो जगाच्या दृष्टीने धर्मवेडा होता. त्याकाळचे शास्त्रज्ञ, का, कारण त्याचा—त्याचा संदेश त्यांच्या वैज्ञानिक समजेबरोबर मेळ खात नव्हता. तो म्हणाला, "आकाशातून पाऊस पडून पृथ्वीवर पूर येईल."

89 हे पृथ्वीवरून चंद्रावर क्षेपणास्त्रे पाठवू शकतील, किंवा होकायंत्र वापरून अशा प्रकारचे कार्य करू शकतील. ते म्हणत होते, "येथे वरती पाणी सापडत नाही. मी वैज्ञानिक रित्या हे सिद्ध करू शकतो की तेथे पाणी नाही," एक शास्त्रज्ञ म्हणू शकेल.

90 परंतु नोहा म्हणाला, "देवाला सर्व शक्य आहे. जर तेथे पाणी नसेल, तर तो निर्माता आहे, तो तेथे पाणी उत्पन्न करील. आणि ते कशाप्रकारे करायचे हे तो जाणतो." परंतु तो एक चिन्ह असा होता. तिथे पाणी नसताना देखील तो तारू बांधू लागला, त्याने—त्याने ते कसंतरी बांधले सुद्धा. तो त्या लोकांसाठी एक चिन्ह म्हणून होता.

91 पहा, मोशे हा मिसरात लोकांसाठी एक चिन्ह होता, त्यांनी त्याच्या द्वारे अनेक चमत्कार पाहिले. त्याच्यानंतर, शलमोन.

92 नंतर आपण इथे पाहतो येशुला देखील...एक चिन्ह जे तो त्यांना देत होता, ते त्यांच्या शास्त्रलेखाप्रमाणे खरे भविष्य सुचक चिन्ह होते.

93 आता अनेक अशी पण चिन्हे आहेत ज्यांना शास्त्राचा आधार नाही. आपल्याला शास्त्र आधारित चिन्हांची गरज आहे. ज्यामधून **प्रभू परमेश्वर असे म्हणतो** हे विदीत झाले पाहिजे, ते बायबल मधून असलं पाहिजे, तेव्हा आपल्याला कळते की ते खरे आहे. अर्थात, तेथे अनेक तत्संबंधी गोष्टी आहेत व देव आपल्या मर्जीस येईल ते करू शकतो. तो देव आहे. परंतु मला ठाऊक आहे की तो आपले अभिवचन पाळतो, म्हणून मी त्या गोष्टी त्याच्या वचनामधून पाहू इच्छितो, तेव्हा मी म्हणू शकतो की ते सत्य आहे कारण ते वचनाप्रमाणे आहे.

94 आता आपल्याला दिसते की या काळामध्ये, येशु शास्त्रात विदीत केलेले चिन्ह प्रकट करत आहे, जरी परंतु ते शास्त्रामधील चिन्ह मागत होते...कारण ते त्या चिन्हाला शास्त्रातील चिन्ह म्हणून मानण्यास राजी नव्हते, कारण त्यांना लोकांना देण्यासाठी उत्तर हवे होते, ते म्हणाले, "तो—तो त्याच्या मनचे बोलत आहे. त्याला—त्याला भुताने पछाडले आहे." आणि ते त्याला, "बालजबूब" म्हणत, संबोधत. आणि त्या संबंधाने तो त्यांचा निषेध करत असे. जेव्हा तो परत येईल तेव्हा कशाप्रकारे असेल बरे?

95 इथे लक्ष द्या, तो योना विषयी संबोधून म्हणाला. "जसे योनाच्या दिवसात घडले," अर्थात योना, "तशाच प्रकारे मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या दिवसात घडेल."

96 आता अनेक लोक योनाला दोषी ठरवितात. मी त्याला दोषी मानत नाही. मला ठाऊक आहे, ते म्हणत, "आता पाहा तो योना आहे." तुम्ही हे विडंबन ऐकले आहे काय. परंतु ख्रिस्ती लोकांनी असं करू नये. तुम्ही देवाच्या सेवकांचा निषेध करू नये. योना हा एक संदेष्टा होता. त्याचंयेणं देवाच्या इच्छे विरूद्ध नव्हते. त्यांनी तशा प्रकारेच केले. एक चिन्ह म्हणून जे करावे ते त्याने केले. सर्व काही जे घडते, ते उगीच घडत नसते, तर ते चिन्हा साठी घडते.

97 एकेकाळी, अशा एका संदेष्टयाला एका कसबीणिशी लग्न करून तिच्यापासून मुले जन्माला घातली. एका जणाला तर आपल्या एका कुशीवर तीनशे चाळीस दिवस राहावे लागले व त्यानंतर त्याने आपली कुस बदलली. एकाला तर नग्न व्हावे लागले. आणि

ह्यामधील प्रत्येक गोष्ट ही एका चिन्हा साठी घडत होती, पहा. आणि योनालादेखील चिन्हा साठी हे सर्व काही करावे लागले.

98 काय तुम्हाला आठवते काय, अब्राहामला आपल्या इच्छेविरुद्ध हागारेशी लग्न करावं लागले, जेव्हा सारेने आपली दासी त्याला देऊ केली, तेव्हा त्याने तिला नकार दिला. परंतु देवाने प्रकट होऊन त्याला सांगितले, "तू सारेचे ऐक, कारण दासीपुत्र स्वतंत्र स्त्री च्या संताना बरोबर वारिस होणार नाही." तिला जी मुले होतील ती बाहेर घालविली जातील. ते काय होतं? हे एक चिन्ह होतं. हे सर्व चिन्ह रूपाने आहे. देव चिन्हांकरिता सर्वकाही घडवितो.

99 आणि योना एक चिन्ह होता. जर तुम्ही इथे पाहिले, येशु त्यांना असे म्हणतो, "आता पीडित, दृष्ट व व्यभिचारी पिढी चिन्ह मागते, व त्यांना ते देण्यात येईल. जशाप्रकारे योना माशाच्या पोटात तीन दिवस व तीन रात्र होता, तशाच प्रकारे मनुष्याचा पुत्र देखील पृथ्वीच्या पोटात तीन दिवस व तीन रात्र राहील." मग आता इथे योना कोणत्या प्रकारचे चिन्ह दर्शवत होता? तो तर पुनरुत्थान चे चिन्ह होता. ठीक आहे.

100 आता, जर तेव्हाची पिढी जर विकृत होती, आपण देखील अशाच परिस्थितीमध्ये जगत आहोत. आपण हे जाणता. येथे सर्व प्रकारची मानसिक शारीरिक लैंगिक विकृती आहे. सर्व काही विकृत आहे. सर्वात जास्त, अविश्वासी जर कधी असतील, तर ते ह्या दृष्ट पिढीत आहेत. आता तर आपल्याला—आपल्याला धार्मिक प्रकारचे अविश्वासी आढळतात, ज्यांच्याशी व्यवहार करणे खूप कठीण आहे.

101 मी एक सुवार्तीक आहे. मी अनेक ठिकाणी मोहिमेवर गेलो आहे आणि मी बघितले आहे कशाप्रकारे तिथे परराष्ट्रीय नास्तिक लोकांना आणतात, ज्यांना उजवा हात कोणता व डावा हात कोणता हे देखील ठाऊक नाही. त्यांना ते ठाऊक नसणार. आता तो—तो अशा परिस्थितीतून येतो. त्यांनी कधी देवाविषयी ऐकले नसते. आता त्याला काही तरी बघण्याची इच्छा असते. आणि जर तुम्ही त्याला सत्य सिद्ध करून दाखवलं, तर तो लगेच स्वीकारतो.

102 पण इथे तर शिकलेले नास्तिक लोक आहेत. पहा, हा शब्द खुपच भीषण आहे, पण हे सत्य आहे. बघा हा जो शिकलेला नास्तिक आहे, तो प्रत्येक गोष्टीविषयी आपले मत मांडू इच्छितो, बघा, तो सर्व गोष्टीविषयी खूप काही जाणतो. त्याला स्वत:ला नम्र करून देवाचे वचन विश्वासाने पाहणे, समजणे जमत नाही.

103 त्या दिवसातील परुशी लोक देखील अशाच प्रकारे होते, देवाचे वचन समजू शकत नव्हते. त्यांच्यासमोर सर्वकाही असताना देखील त्यांना त्याकडे बघायचे नव्हते. आणि त्यामधील अत्यंत वाईट गोष्ट म्हणजे त्यांना ठाऊक नव्हते की ते आंधळे आहेत. देवाने हे सर्व चिन्हासाठी घडविले.

104 आता आजच्या दिवसात पहा, ज्या दृष्ट पिढीमध्ये आपण राहत आहोत त्या आपणाला एक चिन्ह देण्यात आले आहे, हे चिन्ह म्हणजे पुनरुत्थान. तो असे नाही म्हणाला कि तेथे एक असेल. "दृष्ट व व्यभिचारी पिढी चिन्ह मागते, आणि योनाचे चिन्ह देण्यात येईल, ते म्हणजे पुनरुत्थान." आणि जगभर आम्हाला दुष्टपणा, व्यभिचार, विकृतीनी भरलेली पिढी दिसून येते. ती सर्व फक्त न्यूयॉर्क मध्येच आहे असा विचार करू नका. तुम्हाला ते अजून कळलं नाही. ते जगभर आहेत. फक्त अमेरिका मध्येच आहेत असे समजू नका. ते जगभर सर्वत्र आहेत. ठीक आहे. "व्यभिचारी पिढी," बघा, तेच आहेत जे पुनरुत्थानाचे चिन्ह स्वीकारतील.

105 ह्या सर्व दिवसांमध्ये, जेव्हा बुद्ध, सिख लोक, जैन लोक आले आणि त्यांनी हजारो प्रकारचे धर्म आणि पंथ जगभर बनवले, त्यामधील प्रत्येक जण तुम्हाला त्यांच्या संस्थापकांच्या कबरा दाखवतील. परंतु ख्रिस्ती लोकांकडे खाली कबर आहे. पहा?

106 हेच केवळ नाही, तुम्ही त्या लोकांना असे देखील सांगू शकत नाही, "की तो माझ्या हृदयात वस्ती करतो." ते तुम्हाला सरळ त्याच्या वचनाकडे पुन्हा आणतील. ते हे करतीलच. ते तुम्हाला सरळ त्याच्या वचनाकडे आणतील. आणि हो, तुम्ही परराष्ट्रीय लोकांना मानसशास्त्र दाखवू शकत नाही, बघा, कारण त्यांचा देव देखील त्यांच्या हृदयात वसतो.

107 मी मुसलमान लोकांना रस्त्यावर पडून, "अल्ला, अल्ला" म्हणताना ऐकले आहे, ते त्यामध्ये एवढे गुंतून जातात की त्यांच्या—त्यांच्या बोटामध्ये एखादी काच शिरली तरी ते त्यांना कळणार नाही.

108 मी झूरिच, स्विझलँड मध्ये असा एक व्यक्ती बघितला आहे जो आपल्या फुफुसा मधून तलवार घुसवून ती आरपार काढू शकतो. आणि त्या छेदामधुन पाणी टाकण्यासाठी ते तिथे एक वैद्याला बोलावतात. ती तलवार बाहेर काढल्यावरही त्यातून रक्त येत नाही. बघा? आपल्या हनुवटीतुन भाला घुसवून तो नाकातून बाहेर काढताना पाहिला आहे.

109 तर आता, जेव्हा तुम्ही अशा प्रकारच्या लोकांना देवाविषयी सांगण्याचा प्रयत्न कराल तेव्हा आपण काय बोलत आहोत ह्याविषयी जपा. तुम्हाला हे समजले पाहिजे. येथे फक्त मानस शास्त्राने भागणार नाही. तो ते तुम्हाला आपल्या कृतीतून लगेच दाखवतील. तुम्हाला आपल्या शब्दाविषयी जपणे गरजेचे आहे.

110 परंतु कर्मेल डोंगरावर देव जसा एलिया सोबत होता तसाच तो आज देखील आहे. आणि मी त्याला चक्क हजार लोकांसमोर असे करताना पाहिले आहे. बघा, आणि तेथे अनेक भूत विद्या प्रवीण वैद्य तुम्हाला आव्हान करीत उभ्या असताना, त्यांनी पवित्र आत्म्याची कार्य पाहिली आहेत. पहा? तुम्ही पुस्तकात वाचले आहे व तुम्ही हे जाणता, आणि तुम्ही देवाच्या ह्या विधानाला दुजोरा ध्याल. तो आताही देवच आहे. तो आपल्या वचनाशी बांधील आहे. तो तुमच्या इच्छा आकांक्षाशी बांधील नाही. तो आपल्या वचनाशी बांधील आहे. बघा? आता आपण इथे परराष्ट्रीय लोक व त्यांचं वागणं बघितलं.

111 आता देवाने या अंतिम काळात हे अभिवचन दिले आहे की तो ह्या दुष्ट व व्यभिचारी पिढीला पुनरुत्थानाचे चिन्ह दाखवून हे सिद्ध करील की तो मेला नाही. तो अजूनही जिवंत आहे. तो आपण दिलेले एक एक वचन पाळतो आणि ते तुमच्या जीवनात पूर्ण करतो. "अजून थोडावेळ आणि जग मला पाहणार नाही," येशू म्हणाला, "पण तुम्ही मला पहाल," पहा, तो इथे विश्वासी लोकांशी बोलतो, "कारण मी," मी एक सर्वनाम आहे, "ह्या जगाच्या शेवटापर्यंत मी तुम्हाबरोबर असेन, तुम्हामध्ये असेन, जगाचा नाश होईपर्यंत." आणि कृत्ये याविषयी, संत योहानाचा 14 वा अध्याय बारा वचन म्हणते, "मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, मी जी कृत्ये करतो, ती माझ्यावर विश्वास ठेवणाराही करील," तीच कृत्ये! "येशू ख्रिस्त काल, आज व युंगनुयुग सारखाच आहे," इब्री 13:8.

112 आता मंडळीने अनेक युगांतून प्रवास केला आहे, बायबलमध्ये सर्वात सुरुवातीला, इफिस युगातील मंडळी. आणि जर देवाची इच्छा असेल, मी इथून जाणयाअगोदर, मला एक लहानसा संदेश प्रचार करायचा आहे ज्याचा नाव *एक उलट गणती* आणि त्यामध्ये आपला प्रवास कुठून व कसा झाला, व आपण किती प्रगती केली हे बघणार आहोत. आता येथे लक्ष द्या, इफिस येथील मंडळी व त्या नंतरचे अनेक मंडळया एक हजार वर्षाच्या अंधकार युगात ढकलल्या गेल्या. आणि त्यानंतर लुथर जो एक पहिला सुधारक होता

त्याचा उदय झाला, त्यांनी न्यायीपण आणले, त्यानंतर वेस्ली आला, त्यांनी पवित्रीकरण आणले, त्यानंतर पेंन्टेकॉस्टल युग आले, त्यात पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा आला. ह्या सर्व महान सत्ता समोर मंडळी सर्वदा अल्पमतात जात राहिली. "कारण शत्रू पाण्याच्या लोंढ्यासारखा येईल तेव्हा परमेश्वराचा आत्मा त्याच्याविरुद्ध झेंडा उभारील."

113 आणि आपण आता पेंन्टेकॉस्टल युग मागे सोडले आहे. आता आपण पिरॅमिडच्या कळसापर्यंत पोहोचत आहोत, हा शिकवणीचा कळस नव्हे, पण पण पिरॅमिडचा कळस. जेव्हा त्यावर कळसाचा दगड बसविण्यात येईल, त्या अगोदर त्या दगडाला घासले पाहिजे. मंडळींमध्ये एका सेवकाई ची सुरुवात झाली पाहिजे, एक जिवंत देवाची खरी मंडळी, जेव्हा तेथे तो कळसाचा दगड येईल, ख्रिस्त, किंवा ख्रिस्ताची सेवकाई, आणि त्या मधोमध ख्रिस्त परिपूर्ण रित्या बसवला जाईल. आणि त्यानंतर तिथे सोडविलेले जन येतील, व ते देवाच्या संपूर्ण घराला गौरवात घेऊन जातील. मेथडिस्ट, बाप्टिस्ट आणि प्रेसबीतेरियन पंथीय लोकांनी, देवाच्या राज्यासाठी, महान सुधारणेच्या काळात झालेला छळ सहन करून आपल्या प्राणांची आहुती दिली. पण तो दगड येत आहे. होय, श्रीमान. तो खचितच येईल. देव त्याला पाठवीत आहे. त्या दगडावर संपूर्ण इमारत उभी राहणार आहे. पहा? आता आपण जेव्हा ह्या चिन्हाकडे पाहतो, तेव्हा आपल्याला कळते की ख्रिस्ताची सेवकाई आपले टोक गाठू लागली आहे, जेणे करून आत्म्याच्या परिपूर्णतेने ख्रिस्ताची सेवकाई पूर्ण व्हावी.

114 लूथरच्या काळात तोच पवित्र आत्मा होता व त्याने न्यायीपणा शिकविला, त्याने वेसलीच्या काळात पवित्रीकरण शिकविले, संदेशांच्या काळात, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा शिकविला, ह्या द्वारे तीन पूर्ण झाले. इथे तीन हे, कृपेच्या तीन पायऱ्या नव्हेत, पण मी त्यांना तीन स्थानके म्हणेन.

115 आता तुम्ही ह्या प्रकारे बघा. जेव्हा एक बाळ जन्मास येते, तेव्हा त्याचा जन्म तीन गोष्टी द्वारे होतो. नैसर्गिक जन्म तेव्हा प्रथम ही गोष्ट…प्रौढानो इथे लक्ष द्या, लहान बाळकाना हे समजणार नाही. परंतु, आपण बघूया, नैसर्गिक जन्म तेव्हा प्रथम तेथे पाणी, मग रक्त व त्या नंतर जीवन उदयास येते.बघा?

116 आता नवा जन्म देखील अशाच प्रकारे होतो, पाणी, रक्त, आत्मा. जे घटक शरीरातून येतात तेच शरीराला बनवतात. पहा? तशाच प्रकारे, त्याच्या वधूला बनवण्यासाठी—साठी लागणारे घटक त्याच्या शरीरातूनच येतात. कारण, आदामाची वधू त्याच्या शरीरातून बाहेर काढली होती. तशाच प्रकारे ख्रिस्ताची वधू देखील त्याच्या शरीरातून काढली जाईल. आणि जेव्हा ख्रिस्त मरण पावला, तेव्हा त्याच्या शरीरातून तीन घटक बाहेर पडले, ते म्हणजे पाणी, रक्त व आत्मा. विश्वासाद्वारे न्यायीपण, म्हणजे पाणी, रक्ता द्वारे पवित्रीकरण आणि पवित्र आत्म्याद्वारे बाप्तिस्मा.

117 आता ही शेवटची पायरी परिपूर्णरित्या घडली पाहिजे, ज्याद्वारे पवित्र आत्मा मंडळीमध्ये परिपूर्ण रित्या येऊन वस्ती करील, तो मस्तक व शरीर ह्या दोघांना एकत्रित करील. पहा? पहा? तेच शरीर आहे. तोच शरीराचा मस्तक आहे. आता आपण पाहतो की त्याने हे अभिवचन दिले होते, की ह्या शेवटच्या दिवसात, हे सर्व केले जाईल. आपल्याला हे सापडते.

118 आता योना विषयी. अनेक लोक योना विषयी असे म्हणतात, "पहा, तो मनुष्य तर अविश्वासी होता." पण तसं नाही.

119 त्याला निनवेला जाणे होते, हे सत्य आहे, कारण ते पापाने भरलेले एक महान शहर होते. आणि तिथे कदाचित पाच लाख लोक राहत असतील, जे अत्यंत वाईट होते. ते एक

महान व्यवसायिक शहर होते. त्यांचा मुख्य व्यवसाय मासेमारी होता, हे समजते, म्हणून ते. त्याला तेथे जाण्यासाठी पाठविण्यात आले होते, पण तो चुकीच्या जहाजामध्ये चढून तार्शिसास—सास गेला.

120 आता अनेक लोक म्हणतात की त्याला ते करायचे नव्हते. मी विश्वास करतो कि ते सर्व देवाने नियोजित केले होते. मी एक लहान गोष्ट वाचत होतो, जी त्याकालाविषयी पुरावा देऊन योनाच्या कृत्याचे समर्थन करते, ज्याद्वारे मी तुम्हाला जे सांगू इच्छितो त्याकडे घेऊन जातो.

121 आता योनाने जेव्हा चुकीचे जहाज पकडले, तेव्हा सर्व प्रथम आपण हे पाहतो की तो चुकीच्या मार्गाने जात होता, पुढे त्याच्यावर संकट आले. मोठा वारा उसळून, मोठ्या लाटा गर्जु लागल्या, सर्वांना वाटले ही जहाज आता बुडणार आहे. योना तर तेथे गाढ झोपी गेला होता व ते त्याला उठवून म्हणाले, “अरे झोपणाऱ्या उठ आणि तू आपल्या देवाला हाक मार!”

122 आणि तेव्हा योनाने कबूल करून सांगितले तो चुकला आहे. तो म्हणाला, “आता तुम्ही माझे हात—पाय बांधून मला जहाजावरून लोटून द्या म्हणजे वादळ शांत होईल.” आणि त्यांनी तसे केले.

आणि देवाने एका महाकाय माश्याला तयार केले होते.

123 आता, काही समयापूर्वी मी लुईसविले केंटकी येथील काही वैज्ञानिकांना बोलताना ऐकत होतो, मी पूर्वी जेफर्सनविले मध्ये राहत असताना तेव्हाची गोष्ट. तिथे त्यांनी एका फरशीवर वेल माश्याचा सांगाडा लावून त्याविषयी हा वैज्ञानिक भाषण देवून सांगत होता की त्याला किती दात होते आणि तो म्हणाला ते मला माहिती नाही. मग तो शेवटी मला म्हणाला, “तुला बायबलमधील ती गोष्ट माहिती असेल,” म्हणाला, “जे की सत्य नाही,” तो म्हणाला, “बायबल मधील…”.

124 हे माझ्यासाठी खुप भारी झाले होते, म्हणून मी आणखी जवळ गेलो. मी विचार केला, “आता काय बोलणार आहे मला बघायचे आहे.”

125 तो म्हणाला, “तुम्ही ती बायबल ची—ची गोष्ट ऐकली असेल.की ज्या मध्ये वेल मासा योनाला गिळून टाकतो,” आणखी म्हणाला, “माझी इच्छा आहे की तुम्ही हे सर्व बघावं. एक मनुष्य त्याच्या घशातून कसाकाय आत जाऊ शकतो, जेव्हा तिथे एक बास्केट बॉल जाण्याएवढी जागा देखील दिसत नाही?”. तो म्हणाला, “हे सर्व चुकीचे आहे.”

126 तेव्हा त्या नास्तिक माणसाचे हे बोलणे ऐकून मला रहावले नाही. मी त्याला म्हणालो, “क्षमा असावी श्रीमान. तुम्ही कधी बायबल वाचले आहे काय?”.

तो म्हणाला, “खचितच.”

127 मी म्हणालो, “आता बघा,” “तुम्ही तिथे तसं विधान का केलेत? देव असं म्हणाला नाही की तो वेल मासा होता म्हणून. देव म्हणाला की तो एक ‘मासा’ होता.”

तो म्हणाला, “आता तो वेल मासा देखील असू शकतो.”

128 मी म्हणालो, “जर असेल की तो वेल मासा होता. तर तो विशेष रीतीने बनविला होता, देवाने आपल्यासाठी बनविला होता.” हा एक विशेष होता. तो असा एक बनवू शकत होता ज्याच्या मध्ये पूर्ण गाडी घुसू शकते. तो देव आहे, आणि म्हणून हे सत्य आहे. आम्हाला अशा कथांवर विश्वास करायचं नाही, तश्या गोष्टी, किंवा बायबलमधील कथा. देवाने योनासाठी हा मासा तयार केला होता. तो एक विशेष प्रकारचा मासा होता, की ज्याने—ज्याने योनाला गिळंकृत केले.

129 आणि आता तो वेल माशाच्या पोटात होता. आणि त्याचे हात पाठी खेचून व त्याचे पाय बांधले होते. आता तुम्ही त्या मनुष्याचे परिस्थिती समजू शकता. आणि काहीही असो, वेल मासा किंवा असा इतर कोणताही मासा, आपले तोंडाचा भोंगा करून अन्न शोधीत पाण्यात फिरतात, आणि त्यानंतर समुद्राच्या तळाशी जातात.

130 आता तुम्ही तुमच्या लहान गोल्डफिश माशाला अन्न देऊन बघा. तो आपले पोट भरतो व त्यानंतर तो समुद्राच्या तळाशी जाऊन आपले आपले कल्ले बाहेर काढतो. आणि तेथे तो आराम करतो, कारण त्याला—त्याला त्याचे अन्न मिळाले आहे.

131 आता येथे, जेव्हा ह्या माशाला संदेष्टा दिसला, आणि त्याने त्याला गिळंकृत केले, त्यानंतर कदाचित तो मासा समुद्राच्या—च्या तळाशी गेला असेल. आता मी हे खात्रीलायक सांगत नाही तो खाली गेला, पण मी म्हणतो की तो—तो—तो खाली गेला असेल कदाचित. आणि आता ह्या माणसाकडे बघा.

132 आता आपण सर्वदा असेच विचार करत असतो, पण हे खूप वाईट आहे आणि जेव्हा शैतान आपल्याला अनेक लक्षणे दाखवून म्हणतो, “आता बघा, तुम्ही बघा, तू काल पेक्षा आज बरा नाहीस. तू बघ, तू बरा नाहीस,”. तेव्हा तुम्ही त्या लक्षणांकडे लक्ष देऊ नका.

133 जर कोणाला जास्त लक्षणे दिसली असतील, तर ही योनाला. बघा? पहा, सर्वत्र जेथे कुठे तो बघत होता तेथे त्याला वेल माशाचे पोटच दिसत होते. पाहिलेत? परंतु तुम्हाला ठाऊक आहे की, तो काय म्हणाला? “जे निरर्थक मूर्तींना भजतात.” तो असं नाही म्हणाला, “मी आता *ह्या*कडे बघतो.” तो म्हणाला, “मी पुन्हा एकदा तुझ्या पवित्र मंदिराकडे पाहीन.”

134 कारण त्याला ठाऊक होते की, जेव्हा शलमोनाने प्रार्थना करून मंदिर समर्पित केले, तेव्हा तो म्हणाला, “जिथे कुठे तुझी लोक संकटात असतील, आणि ते जर ह्या पवित्र जागेकडे वळून प्रार्थना करतील, तर ती त्यांची प्रार्थना तू स्वर्गातून ऐक.” त्याला शलमोनाच्या प्रार्थनेवर भरवसा होता, हो एक मनुष्य होता, एक पृथ्वीवरील मनुष्य तुम्हा–आम्हा सारखा, जो की कालांतराने पतित झाला, स्त्रियांनी त्याचे लक्ष देवाकडून वळविले. आणि, परंतु, त्याची प्रार्थना देवाने ऐकली, आणि ह्या परिस्थितीत देखील त्याचा विश्वास ढळला नाही.

135 आता आपल्याला आपल्या मध्ये किती विश्वासाची गरज आहे, जेव्हा आपल्याला मनुष्यनिर्मित मंदिराकडे बघण्याची गरज नाही; पण स्वर्गाकडे बघण्याची गरज आहे, जिथे पुत्र आपल्या स्वामीच्या उजवीकडे बसला आहे, ज्यांनी कधी काळी आपले रक्त दिले होते, व जो सर्वदा मध्यस्थी करत असतो!

136 आणि आपल्या मधील कोणासही त्या प्रकारची लक्षणे दिसली नाहीत. आपण सर्वदा, देवाच्या उपस्थित लोकांना बरे होताना पहिले आहे. आपण कधीही लक्षणांकडे बघू नये, ते निरर्थक मूर्ती आहेत. तुम्ही देवाकडे बघा, कारण त्यानेच अभिवचन दिले आहे.

137 आता तिथे काही घडलं असेल, तरी देवाने संदेष्टयाला प्राणवायू पुरविला, तो कसा काय ते मला ठाऊक नाही. परंतु तो—तो तीन दिवस व तीन रात्र जगला, असे बायबल सांगते. आणि मला हे देखील ठाऊक नाही की तार्शिष येथून किती लांब आहे किंवा निनवे तेथून किती लांब आहे ते, आणि ते समुद्रामध्ये किती आत होते ते, परंतु योना जिवंत राहिला, तीन दिवस व तीन रात्र, असे शास्त्रलेख सांगते. त्याने त्याला बोलावले होते.

ते म्हणतात, “अरेरे, हे तर अशक्य आहे.”

138 लाजराला उठण्या विषयी कसे होते बरे, तो तर चार दिवस अगोदर मरण पावला होता ना? पहा? आणि एके दिवशी तो आपल्याला देखील असंच उठवेल, जरी आपण दहा हजार वर्षांपूर्वी मरण पावले असू. त्याला त्याचा काही फरक पडत नाही, बघा, ते तसंच घडेल. पहा, तो देव आहे.

139 आता आपण येथे बघतो की तो आता निनवेत पोहोचला आहे. तो वेल मासा त्याला पाण्याखालून घेऊन येत आहे, जशाप्रमाणे एक मोटारगाडी घेऊन येते. समुद्राखालील मोटार गाडी मधली सफर करून, तो थेट निनवेस पोहोचला, आणि ती बहुदा दुपारची वेळ असावी.

140 हे बघा, आता, तिकडले लोक हे कोळी होते. आणि व्यावसायिक कोळी असल्याकारणाने ते आपले जाळे बाहेर खेचून नीटनेटकी करत होते. आणि ते सर्व परराष्ट्रीय होते. ते मूर्तिपूजा करत असत. आणि त्यांचा एक देव…

141 जशाप्रकारे अमेरिकेत राहणाऱ्या भारतीय लोकांचा अस्वला सारखा दिसणारा देव आहे, ज्याला ते ओविगास म्हणतात, आणि हे सर्व परराष्ट्रीय भारतीय लोक ख्रिस्ताकडे येण्याअगोदर, त्याला ते भजत असत. त्यांच्याकडे हा देव होता, शक्तीचा देव.

142 आणि निनवेमध्ये, जशाप्रकारे मला सांगण्यात आले ते वेल माशाला समुद्र देव मानत असत, कारण तो समुद्राचा मालक आहे. तो काहीही गिळू शकतो. आणि ह्या दुपारच्या वेळेला, तेथे समुद्रामधून त्यांचा देव प्रकटला, त्यांनी आपले तोंड उघडले व त्याच्या तोंडातून एक संदेष्टा किनाऱ्यावर चालत आला. यात आश्चर्य नाही की त्यांनी त्यावर विश्वास ठेवला. बघा. त्यांनी खचितच विश्वास ठेवला, कारण तो संदेष्टा जो संदेश देत होता, तो त्यांच्या देवाच्या मुखातून बाहेर आला होता. “पश्चाताप करा अथवा या शहराचा नाश केला जाईल.” पहा?

143 तर तो देवाच्या इच्छेविरुद्ध नव्हता. तो तर सर्व अशाप्रकारे करत होता, “देवावर प्रीती करण्यासाठी सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात,” हे सत्य आहे, “आणि जे त्याच्या कार्यासाठी बोलावले गेले आहेत”. येशु त्याच्याविषयी म्हणत होता.

144 आता अजून एक पात्रा कडे बघून त्यानंतर आपण प्रार्थना रांगेकडे वळणार आहोत. त्यांनी शलमोना विषयी देखील म्हटले आहे.

145 आता, जेव्हा जेव्हा देवाने पृथ्वीवर दान पाठविले, आणि जर लोकांनी त्याचा आदर केला, तर ते त्या लोकांसाठी सुवर्ण युग ठरले आहेत. परंतु जेव्हा त्यांनी ते नाकारले, तेव्हा–तेव्हा लोकांमध्ये गोंधळ उडाला. तो ते—ते प्रत्येक युगात करतो. जरा पहा. जरा पहा, जेव्हा त्यांनी येशूचा नकार केला, आणि जेव्हा त्याने संदेष्टयाचा नकार केला आणि अशाप्रकारे तेव्हा काय घडले.

146 परंतु शलमोनाच्या काळात, सर्वांनी विश्वास ठेवला. शलमोनाकडे विवेकाचे दान होते. देवाने शलमोनाला ते दिले होते. ते…आणि लोकांनी पूर्ण ऐक्याने त्यावर विश्वास ठेवला. त्या लोकांविषयी असे म्हटले आहे की ते सहस्त्र वर्षे होते, त्या काळचे इब्रीं वंश. ते एक सुवर्णयुग होतं, शलमोनाचं युग होतं. त्याकाळी कोणतेही युद्ध वगैरे काही नव्हतं. त्यांनी त्याची भरभराट केली. त्यांनी मंदिर बांधले अशा अनेक महान गोष्टी त्यांनी शलमोनच्या काळात केल्या, कारण तो एक प्रतिरूप होता, दविदाचा पुत्र, तुम्ही पहा, दविदाचा दैहिक पुत्र. आता आपण येथे बघतो की या काळामध्ये त्यांनी मंदिर व इतर सर्व गोष्टी बांधल्या व ते सर्व देवाने त्यांना दिलेल्या त्या दानाचा आदर करत होते, आणि त्यांनी त्याला राजा बनविले. आणि त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली.

147 आणि मी तुम्हा अमेरिकी जनतेला सांगतो, जर आपण देवाने आपल्या दिलेल्या दानाचा आदर केला, जो म्हणजे पवित्र आत्मा, तर आपल्याला रशियन अंतराळवीर किंवा अणुबॉम्ब या सर्वांविषयी चिंता करण्याची गरज नाही. कारण पहा ख्रिस्त आपली—आपली सुरक्षितता आहे. पहा? तो आपली सुरक्षा आहे.

148 पण ह्या गोष्टीचा त्रास आहे, जेव्हा तो आपल्याकडे दान पाठवतो आणि आपण त्यावर हसतो व त्याची टिंगल करतो, जशा प्रकारे त्या लोकांनी केले. याच कारणामुळे आपला न्याय–निवाडा होणे क्रमप्राप्त आहे...ते आपल्यावर येणारच आहे. ते अशाप्रकारे आहे, देव कोणा मनुष्याचा आदर करत नाही. जर देवाने या जगाला असेच जाऊ दिले, ह्या न्यू यॉर्क शहराला, ह्या अमेरिका देशाला, ह्या जगाला जे ते करत आहेत त्यामधून जाऊ दिले, व त्यांच्यावर न्यायाचा प्रसंग आणला नाही, तर त्याला हे करणे भाग पडेल, एक न्यायी देव म्हणून, सदोम व गमोरा च्या लोकांना उठून त्यांना जळवल्याबद्दल त्यांच्याकडून क्षमा मागवी लागेल, कारण त्याने त्या लोकांना आताच्या आपल्या कृत्ये सारखे कृत्ये केल्या मुळे त्यांचा अग्नीने नाश केला. पहा? तर त्यांनीहे अभिवचन दिले की ते अशाप्रकारे घडेल.

149 आता आपण पाहतो की, शलमोनाच्या दिवसात, काय तुम्ही विचार करू शकता, सर्व लोक देवाशी असे म्हणत असतील तर, “शलमोनाला विवेकाचा महान सामर्थ्य मिळाला आहे!” आणि त्या दानामुळे तो लोकांचे मने जाणू शकत होता, ह्या विषयी लोकांनी जर गर्व केला असता. पण तिथे कोणत्याही प्रकारचा गोंधळ नव्हता, “हे आहे, ते नाही, नाही!” त्या सर्वांनी विश्वास ठेवला. आणि त्याची कीर्ती सर्व राष्ट्रांमध्ये पसरली. आणि सर्व राष्ट्रांना इस्रायली लोकाचा धाक बसला, तो ह्यामुळे नाही की त्यांच्याकडे उत्तम सेना होती, पण ह्यामुळे की त्यांच्यामध्ये देव होता. हीच एक गोष्ट धाक बसविते, तो म्हणजे देव. देव त्यांच्या मध्ये होता.

150 ओह, आपल्या सोबत हे कशाप्रकारे असले पाहिजे, आपण तर स्वतःला एक ख्रिस्ती राष्ट्र म्हणवतो! हे अत्यंत वाईट आहे ती कशाप्रकारे संप्रदाय व इतर गोष्टीने आपल्याला कशा प्रकारे गुंतवून ठेवून आपली ही स्थिती केली आहे, आपल्याला आपल्या मूळ स्थितीपासून दूर केले आहे व कोणाही मनुष्याला तो कशावर विश्वास ठेवतो हे ठाऊक नाही.

151 आणि बघा, शलमोनाची कीर्ती सर्वत्र पसरून शबा पर्यंत पोहोचली. तेथील राणी पर्यंत ती पोहोचली. ती एक परराष्ट्रीय होती. आणि त्यांच्याकडे हेच होतं...तेव्हा त्यांच्याकडे आपल्याकडे आता असलेले दूरचित्रवाणी व अशा प्रकारच्या गोष्टी किंवा वृत्तपत्रे नव्हती. कोणताही संदेश पाठवण्यासाठी त्यांच्याकडे फक्त एकच मार्ग होता तो म्हणजे ओठा पासून ते कानापर्यंत. प्रत्येक वेळेला जेव्हा जेव्हा उटांचा तांडा येथे येत असे, तेव्हा याविषयी शंका नाही कि ती राणी बाहेर जाऊन त्यांना विचारत असेल, “काय तुम्ही पलिष्टी लोकांच्या देशातून आला काय?”

“होय.”

“तेथे असेच आहे काय, तिकडले लोक काय म्हणतात?”

152 “अहो, तुम्ही तेथे जाऊन पाहिलंच पाहिजे! त्या सारखी दुसरी गोष्ट नाही! त्या लोकांमध्ये तेथे संजीवन आले आहे. तुम्ही...आणि हे राष्ट्रभर गाजलेले प्रकरण आहे. अहो, त्यांच्यामध्ये विस्मयकारक संजीवन आहे. आणि त्यांच्या देवाने एक राजा अभिषिक्त केलेला आहे, आणि त्याच्याकडे विवेकाचे दान आहे. आणि तुम्ही इथे त्या प्रकारचं काही पाहिले नसेल. अशी कोणतीही गोष्ट नाही जी तिथल्या ज्ञानाच्या पुढे जाईल. तो काहीही

सांगू शकतो. हा – हा देवापासून प्राप्त झालेला विवेक आहे. ही देवाची पारख आहे." आणि तेथील लोक तेच ऐकत होते.

153 तुम्हाला ठाऊक आहे की, "विश्वास हा ऐकल्याने, व ऐकणे देवाच्या वचनाने होते." हे ऐकून नव्हे की आम्ही मेथडिस्ट, बाप्टिस्ट, किंवा पेन्टेकॉस्टल पंथी आहोत, परंतु देवाचे वचन ऐकल्याने होते, पहा. "विश्वास हा ऐकण्याद्वारे येतो."

154 आणि जेव्हा ते तिला हे सांगत, व जेव्हा ती ते ऐके, तिच्यामध्ये एक प्रकारची भूक निर्माण झाली. हे सर्व ऐकल्यानंतर, तिने हा निर्णय केला की त्याच्याविषयी काही बोलण्या अगोदर ती तिथे प्रत्यक्षात जाऊन ते पाहीन व त्याची खात्री करीन. अहो, आपण सर्वांनी जर असंच केलं तर किती बरं होईल? पहा? जरी या गोष्टीत शंका नाही की तिच्याकडे अनेक गुंडाळ्या, बायबल, संदेष्टयांचे ग्रंथ, व त्यांच्या भविष्यवाण्या, ज्याद्वारे ती यहोवा देवाचा स्वभाव पारखु शकेल.

155 आता या छोट्या राणीला तेथे जाण्याअगोदर अनेक गोष्टींचा सामना करावा लागणार होता. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे, ती मूर्तिपूजक असल्याकारणाने तिला आपल्या धर्मगुरूची परवानगी घेणे गरजेचे होते व त्यात ती एक राणी व मंडळीची सदस्य देखील होती. तर मी कल्पना करू शकतो की ती कशाप्रकारे आपल्या धर्मगुरूकडे जाऊन म्हणाली असेल, "पादरी साहेब, काय मी इसाएल मध्ये जाऊन, सलमोन नावाच्या महान व्यक्ती, ज्याला की देवाने बुद्धीचे दान दिले आहे त्याच्याकडून बुद्धी प्राप्त करावी काय?"

156 त्यावर मी त्याला बोलताना ऐकू शकतो, "माझ्या मुली, तुझ्या मध्ये असा विचार येईल अशी माझी अपेक्षा नव्हती. आपला संप्रदाय त्या संजीवनाचा भाग नाहीये." पण तुम्हाला ठाऊक आहे की आजच्या दिवसात हे कसं असेल. मी ह्या गोष्टीला एका भव्यतेतून हास्यास्पद पणा देत आहे, हे तुम्ही जाणता. परंतु आत्ताच्या काळात देखील तो आत्मा तश्याप्रकारे म्हणेल. पहा, तोच आत्मा अशाप्रकारे बोलेल व करण्यास सांगेल. मग तिने... "पण तुम्ही तशाप्रकारे करू नये, बघा. कारण सत्य शेवटी ते लोक...ते लोक धर्मवेडे आहेत. ते अनेक प्रकारचे चिन्ह व गोष्टीवर विश्वास ठेवतात. पण तुम्ही इथे हे पाहता, व सर्वांना हे ठाऊक आहे की तो एक धर्म वेड्यांचा गट आहे. ते म्हणतात की समुद्रचे पाणी सुकले व अशा अनेक प्रकारच्या गोष्टी ते म्हणतात की त्यांच्याकडे घडले आहेत, त्यातले काही सत्य नाही. बघा, हे सर्व एका सांगितलेल्या कथेप्रमाणे, किंवा गायिलेल्या गाण्याप्रमाणे आहेत किंवा तशा प्रकारे आहेत. त्यामध्ये काही तथ्य नाही."

157 परंतु तुम्हाला ठाऊक आहे की जेव्हा खरा विश्वास हृदयाला भिडतो तेव्हा तेव्हा एक प्रकारची भूक लागते. तेव्हा त्यांना ते पाहण्याची इच्छा होते.

158 तिथे असा कोणी जिवंत व्यक्ती नाही की जो समयाच्या पडद्या पलीकडे बघू शकेल. "मी कुठून आलो? मी कोण आहे? व मी कुठे जात आहे?" ज्या सर्व प्रकारची चांगली पुस्तके जी कधी वाचण्यात आली, व जी महान ठेवणीतली पुस्तके ज्याची निवड करण्यात आली, येथे असं एकच पुस्तक आहे जे हे सर्व तुम्हाला प्रकट करते की तुम्ही कोण आहात, तुम्ही कुठून आलात व तुम्ही कुठे जात आहात. हो हे असेच आहे. हो असंच आहे. आणि त्यामुळे आपण त्या पडद्या पलीकडे देखील पाहू शकतो.

159 आता त्या लोकांनी जेव्हा या गोष्टी घडताना पाहिल्या व तिने जेव्हा त्या गोष्टी विषयी ऐकले तेव्हा ती म्हणाली, "मला तिथे कसंही करून जायचं आहे." आता आमचा बिशप काय सांगतो ह्याने फरक पडत नाही, ती काही करून जाणार होती, तिने पक्के ठरवले होते, कारण तिला काहीतरी खरे पाहण्याची इच्छा होती. काहीतरी...

160 तर आता, तेथील धर्मगुरूंनी तिला सांगितलं असेल, “आता मुली इथे बघ, तू एक राणी आहेस व तुला अश्या लोकांची संगत ठेवणे योग्य नाही.”

“ह्याने काही फरक पडत नाही, मी एक मनुष्य प्राणी आहे जो कधी ना कधीतरी मरणार आहे.”

161 “तर आता, जर तेथे अशाप्रकारे जर घडले असेल तर ते आपल्या मंडळीत देखील घडत असणार,” हे खरे आहे, कारण आत्मा अजून मेलेला नाही, पहा. “त्या गोष्टी आपल्या येथे सुद्धा घडल्या पाहिजेत, जर असं झालं नाही तर ते सत्य नाही.”

162 तर आता ती म्हणाली असेल, “मी इथे माझ्या लहानपणापासून आहे, व मी समर्पित आहे. तुम्ही ज्यांना देव म्हणता अश्या सर्व प्रकारच्या मुर्त्या व पुतळे मी बघितले आहेत. माझी आजी, माझी पणजी, माझी खापार पणजी देखील येथल्याच होत्या. आणि त्यामधली एकीने देखील अशी काही गोष्ट किंवा जीवनाचं चिन्ह दाखवलं नाही. ते म्हणत होते हेच ‘जीवन’ आहे.”

163 आपल्याला येथे राणीच्या सारखे विचार करणारे अनेक लोक आपल्या इथे न्यूयॉर्कमध्ये व जगभर असणे गरजेचे आहेत.

164 “मला ते प्रत्यक्षात पाहायचे आहे. मला त्या मुर्त्या बघायचे नाहीत. मी ऐकलं आहे की तुम्ही अनेक प्रकारची पुस्तके, प्रार्थना पुस्तके वाचता वगैरे–वगैरे, परंतु हे सर्व कायआहे? त्यामधली मला एक गोष्ट देखील दिसली नाही की जी जिवंत आहे. ते सर्व मृत आहेत, एका प्रकारचे तत्त्वज्ञान किंवा तसेच काहीतरी आहे. माझ्या हृदयाला ते पाहण्याची उत्कंठा लागली आहे. तेथे कुठे देव आहे काय? तो कुठे आहे?”

165 अहो, याची गरज आहे की जग त्यासाठी तहानलेले झाले पाहिजे! की तो कुठे आहे? जर तू कधीकाळी देव असेल, तर तो आता देखील देवच असणार. जर तो तसं नव्हता, तर तो मेला असणार. पहा? “तो सारखाच आहे.” बायबल म्हणते, “तो काल, आज व युगानुयुग सारखाच आहे.”

166 तर आता येथे लक्ष द्या, तिचे हृदय आसुसलेले झाले होते तेव्हा एक चांगला विचार तिच्या कडे आला. ती म्हणाली, “मी तेथे जाताना भरपूर पैसे, उद व गंदरस घेऊन जाते. आणि तेथे जर ती गोष्ट सत्य असेल तर मी त्याचे समर्थन करीन. जर ते सत्य नसेल, तर मी त्याला तसेच सोडून देईन.”

167 तिच्यापासून पेन्टेकॉस्टल पंथी लोकांना शिकण्यासारखे बरेच आहे. अशा लोकांचं जेथे तुम्हाला पवित्र पाखंडी व अनेक नावे दिले जातात आणि तरी तुम्ही अशा लोकांचे समर्थन कराल का. पाहा? अरेरे! आणि बुद्धीचे दान मंडळीत असणे गरजेचे आहे. आता लक्ष द्या. हे सर्व पाळक म्हणू शकतात. आता लक्ष द्या.

168 मग ती असं म्हणते, “मी ही बक्षिसे माझ्या सोबत घेऊन जाते. आणि जर तेथे सत्य आढळले नाही तर मी तीसर्व बक्षिसे परत घेऊनयेईन.” हे चांगले आहे. तर आता ही लहान बाई जाण्यास तयार झाली. तिने आपल्या बरोबर काही खोजे, सर्व पैसे व काही दासी घेतल्या.

169 आता तुम्ही विचार करा, ऐकलेली गोष्ट सत्य आहे किंवा नाही यासाठी तिला किती दूर जावे लागणार होते. पहा? तुम्ही तुमच्या नकाशावर पॅलेस्टाईन ते शबा हे अंतर मोजा. तर ते तंतोतंत नव्वद दिवस, तीन महिन्याचा उंटाच्या पाठीवरून प्रवास होता. तिला... तिला वाटेत अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. ती आपल्या सारखी वातानुकूलित

कॅडिलॅक मोटार गाडीतून येऊ शकत नव्हती. परंतु ती जगाच्या एका दूर असलेल्या संस्कृतीमधून निघून शलमोनाचे ज्ञान ऐकावयास आली होती.

170 आणि रस्त्याच्या बाजूला राहणारे लोक देखील काही चांगलं ऐकण्यासाठी येत नाहीत. ह्यात आश्चर्य नाही म्हणूनच येशू म्हणाला, "ती शेवटच्या दिवसात उठून या पिढीच्या लोकांचा निषेध करील"!

171 तिला वाटेत अनेक त्रास सहन करावे लागले. तुम्हाला आठवते, इस्माएलचे पुत्र, जे वेगवान घोडेस्वार होते, ते वाळवंटात लूट करीत असत. त्या मोठ्या इस्माएली लुटारूंना हे किती सोपे होते की त्यांनी येऊन ह्या छोट्या राणीला व तिच्याबरोबर असलेल्या सहा खोजयांना मारावे व त्यांचा खजिना लुटून न्यावा.

172 परंतु कधी असं देखील घडते, की जेव्हा तुम्हाला देवाविषयी उत्कट भूक असते तेव्हा तुमच्यावर आलेली संकटे तुम्हाला काहीच वाटत नाही. तुम्ही आपल्या मनात निर्धार केलेला असतो, त्या नंतर कोण तुम्हाला काय बोलेल याविषयी तुम्हाला फरक पडत नाही. ते तुम्हाला कोणती पण नावे ठेवतील, तुमच्याशी काही ही बोलतील, ते तुमच्या मार्गात सर्व प्रकारचे अडथळे आणतील, पण जर तुमच्या मनात देवाविषयी भूक असेल, तर तुम्हाला ती कुठेतरी प्राप्त होईलच. हे असंच आहे. पहा. तुम्हाला कोणीही थांबवू शकत नाही. तुमचा पती तुम्हाला थांबवू शकत नाही. पत्नी तुम्हाला शकत नाही. मंडळी तुम्हाला थांबवू शकत नाही. तुमचा पाळक तुम्हाला थांबवू शकत नाही. तेथे अशी कोणतीच गोष्ट नाही जी एका संताला देवापासून पाहण्यापासून दूर करील, जर त्याची खरोखर इच्छा असेल तर. नाही.

तिने त्याबद्दल विचार देखील केला नाही.

173 तशाच प्रकारे तुम्हीदेखील या गोष्टीबद्दल विचार करू नका, की *हा* मला काय म्हणेल आणि माझी आई मला काय म्हणेल व माझे वडील मला काय म्हणतील आणि माझा पती काय म्हणेल. जेव्हा तुम्हाला कळते की येशू ख्रिस्त हाच वास्तविकता आहे, व तुम्हाला कळते की तो जिवंत आहे, तेथे तुम्हाला कोणीही थांबवू शकत नाही, जेव्हा तुमच्या मध्ये ती भूक असते, तेच ते बीज असते ज्याला जगाच्या पायारंभा अगोदर पूर्व नियोजित केलेले असते. जेव्हा त्यावर प्रकाश झोत पडतो तेव्हा त्यामधील जीवन अंकुरित होते.

174 ही लहान स्त्री त्या प्रकारचे बीज होती, जरी ती एक परदेशी व मूर्तिपूजक का असेना.

175 आता, हे लक्षात ठेवा, दिवसा सहारा वाळवंटात खूप गरम होत असल्याकारणाने तिला बहुदा रात्रीचा प्रवास करावा लागत असणार. आणि—आणि रात्रीचा प्रवास केला असणार. कदाचित तेव्हा गुंडाळ्या वाचल्या असणार. "आता आपण येथे शोधूया संदेष्टा देवाविषयी काय म्हणाला. 'मी तुमच्या हृदयातील गुपिते प्रकट करीन. आणि जर तुम्हा मध्ये असा कोणीही आत्मिक व्यक्ती किंवा संदेष्टा असेल, मी प्रभू स्वतः त्याला प्रकट होऊन, त्याच्याशी दृष्टांता द्वारे बोलेन. आणि जेव्हा तो व्यक्ती काही बोलेल, तेव्हा पहा ते तसं घडेल, तुम्ही त्याचे ऐका.' मी तिथे गेल्यावर ह्या गोष्टीचा शोध घेईन. अशाप्रकारेच देव आहे का. ह्याचा मी शोध घेईन."

176 आता येथे लक्ष द्या, काही काळानंतर ती एकदाची संजीवनाच्या जागी पोहोचली. तिथे संजीवन चालू होतं. ती एकदाची पोहोचली. आता तिथे यासाठी आली नव्हती की, "मी तिथे जाईन व काही क्षण स्वस्थ बसेन. आणि जर का मी त्याच्याकडून मुखातून असा शब्द ऐकेन जो माझ्या तत्वात बसत नसेल तर मी तिथून उठून जाणार!" नाही, तिथे पारख करणाऱ्याच्या भूमिकेमध्ये असून, प्रत्येक गोष्टीची पारख करणार होती, पहा. ती इथे तोपर्यंत थांबणार होती जो पर्यंत तीची पूर्णपणे खात्री पटत नाही.

177 तर आज आपण जर असं करू, काही वेळ आदराने शांत राहून म्हणू, “ही गोष्ट जी मी बघतो आहे ती कदाचित सत्य असू शकेल. मला ठाऊक नाही. पण मी त्याविषयी निंदा करणार नाही. परंतु मी शांत राहून मी सर्वकाही पाहणार आहे. आणि त्यानंतर मी त्या गोष्टीची पवित्र शास्त्राबरोबर तुलना करून पाहणार आहे की ते सत्य आहे किंवा नाही.” ही गोष्ट तुम्हालाच करायची आहे.

178 आता ती जगाच्या एका कोपऱ्यातून आली होती. कदाचित तिने जाऊन मंदिराच्या अंगणात आपला तंबू वगैरे ठोकला असेल. आणि कदाचित...आता मी लहान जनांसाठी हे नाट्यरूपात सांगणार आहे.

179 कदाचित त्या एके सकाळी, मंदिराचे दरवाजे उघडले असतील, तुताऱ्यांचा नाद झाला असेल, याजकांनी तुताऱ्या फुंकल्यावर व गायन चालू झाले असेल. आणि तिथे सर्व लहान मुले एकत्रित होऊ लागले असतील, व तिला सर्वात मागे बसायला मिळाले असेल. तर आता, जेव्हा पाळक शलमोन बाहेर आला तेव्हा तिने त्याला बघितले असेल. आणि त्यांनी...त्यांनी त्याची ओळख करून दिली, मग तो लोकांशी बोलला, मग त्याने शास्त्र भाग वाचला व त्यानंतर त्यांनी प्रार्थना केली. आणि त्यानंतर पहिला भाग समोर आला. आता ती म्हणाली असेल, “ह्यामध्ये किती विवेक आहे ते मला आता कळून येईल.”

180 आणि तिला त्यामधला विवेक दिसून आल्यानंतर, कदाचित पुढच्या सभेत ती काही आसने पुढे बसली असेल. कदाचित ती...आणि ते...जर तुम्हाला माझे बोलणे अधार्मिक असेल, तर मला क्षमा असावी. कदाचित तिचे प्रार्थना पत्र त्या संध्याकाळी बोलावण्यात आले नसेल, पाहा, त्यासाठी तिला थोडे थांबावं लागलं असेल. मी तुमचे लक्ष कशावर तरी वेधू इच्छितो, काय तुम्हाला ते समजत आहे काय, पहा. आणि कदाचित तसे घडले देखील नसेल, पण, कालांतराने, ती एकेक भाग जशी बघत गेली तसेच तशी तिची खात्री पटत गेली.

181 पण तिने या गोष्टी घडण्याची वाट पाहिली. तिला तेच हवे होते. आणि बायबल असे म्हणते, “तिला जेव्हा शलमोनाच्या समोर आणण्यात आले, तेव्हा तिच्या मनात असा कोणताही प्रश्न राहिला नव्हता ज्याचे उत्तर शलमोनाने दिले नव्हते. तिला तिच्या जीवनात लागणाऱ्या सर्व गोष्टी विषयी,” देवाने तिला प्रकट केले, शलमोनाला प्रकट केले. आणि जेव्हा तो गोष्टी करत होता तेव्हा ते तिला प्रकट होत होते. आणि त्यानंतर ती उभी राहून ती म्हणाली, “जे काय मी ऐकले होते ते सर्व सत्य आहे, व ते त्याहून अधिक आहे.” ती म्हणाली, “तुम्ही जे सर्व येथे रोज बसून, ते महान चिन्ह, ते महान दान वापरात येताना बघता ते तुम्ही धन्य. हे सर्व मनुष्य जे तुझ्यासोबत असून हे सर्व गोष्टी रोज बघतात ते धन्य आहेत.” तिने देवाचा स्वीकार केला. तिने काहीतरी खरं पाहिले होते. तिचे हृदय भरून आले होते. तिला काहीतरी खरं सापडलं होतं, ज्यात काही खोटी तत्त्वे सांगितली जात नव्हती, ज्यात कुठे मुर्त्या नव्हत्या. परंतु त्यामध्ये जिवंत देव होता.

182 आता, हे आश्चर्य मानू नका येशू बोलला, “दक्षिणेकडची राणी न्यायकाळी ह्या पिढीबरोबर उठून हिला दोषी ठरवील; कारण ती शलमोनाचे ज्ञान ऐकण्यास पृथ्वीच्या सीमेपासून आली; आणि पाहा, शलमोनापेक्षा थोर असा एक येथे आहे.” आणि प्रभू येशूच्या दिवसात देखील, इम्मानूएल, देव देहधारी झाला. “देव ख्रिस्तामध्ये स्वतःबरोबर जगाचा समेट करत होता.” तो तर जिवंत शब्द असा होता. आणि त्या दिवसांमध्ये, जेव्हा ते लोक त्याच्या सेवकांईची निंदा करत असताना तो त्यांना सांगत असे की मी तुम्हाला ह्याबद्दल क्षमा करीन. तो आणखी म्हणाला, “पण जेव्हा पवित्र आत्मा येईल...”

183 तुम्हाला तर त्यांच्यापेक्षा 2000 वर्षे अधिक बायबलचे ज्ञान मिळाले आहे, व 2000 वर्षे अधिक पवित्र आत्मा या जगावर फिरत होता. आता, असे असून देखील ती त्या पिढीचा निषेध करते, तर ती ह्या पिढीचा किती करील? शलमोना पेक्षा थोर असा इथे कोणी आहे! त्या लहान बाईने काहीतरी सत्य पाहिले.

184 मी ही लहान गोष्ट तुम्हाला या अगोदर देखील सांगितली होती, पण मी विश्वास करतो की लोकांना प्रार्थनेसाठी पुढे बोलावताना अगोदर ह्या गोष्टी सांगणे गरजेचे आहे. मला शिकार करणे आवडते. तो—तो...माझा दुसरा मूळ स्वभावच आहे. मला—मला ते आवडते. माझ्यात झालेला बदलावाने देखील ते माझ्यापासून काढून घेतले नाही कारण मला रानात जाणे आवडते. मी इथून उत्तरेकडे जाऊन शिकार करत असे, व अधिरोनदाक इथे काही वर्षा पूर्वी शिकार करत असे. आणि मग मी तिथून निघून पहाडाच्या माथ्यावर जात असे, तेथे सूर्य उगवताना व मावळताना बघत असे, व रडत असे, आणि तिथे अनेक आठवडे राहत असे व निसर्गाद्वारे बोलणाऱ्या देवाचे ऐकत असे. तेथेच तो...

185 निसर्ग हे माझे पहिले बायबल होते. त्याद्वारे मी बघितले की कशाप्रकारे एक लहानसेबीज जमिनीत पडून, हे कडक–कडक होऊन खोलवर जाते, मग कालांतराने ते फुटून त्यातला जीवनरस बाहेर जातो व त्याचा मागमूस संपून जातो, परंतु पुढच्या वसंत ऋतुत ते पुन्हा जीवित होते. पहा? देवाने त्याच्यासाठी मार्ग बनवला आहे. “देवाने त्या बीजाला पुन्हा जगण्यासाठी मार्ग बनवला आहे,” तर मी मी म्हणालो, “येथे माझ्यासाठी देखील पुन्हा जगण्यासाठी मार्ग असेल.” हे सत्य आहे. तर ते माझे पहिले बायबल होते.

186 मी शिकारीला जात असताना माझ्या सोबत यांकी नावाचा एक लहान व्यक्ती येत असे, तो शिकार करण्यात निपुण होता पण तो हृदयातून क्रूर होता. आणि तो एक—तो एक चांगला मनुष्य असेल कदाचित. त्याच्या सोबत शिकारीला जाणे खूपच चांगले होते कारण तुम्हाला तुम्ही कुठे आहात याची चिंता करण्याची गरज नव्हती कारण त्याला ते सर्व ठाऊक असे. आम्ही एकत्र शिकार करत असू पण तो हृदयातून खूप क्रूर होता. आणि मी त्याच्याशी अनेक वेळा बोलून त्याला सांगितले होतं, “तू इतका क्रूर का वागतोस?”

187 आणि मी त्या व्यक्तीची आता टिंगल करू इच्छित नाही पण त्याचे डोळे पाली प्रमाणे दिसत असत. आणि—आणि तो माझ्याकडे बघून म्हणत असे, “हे प्रचारका, असेच बोलत राहशील! स्वतःला बदल बिली! नाहीतर तू एक चांगला शिकारी व प्रचारक देखील होऊ शकणार नाहीस.” तो म्हणाला, “तू एक मृदू हृदयाचा व्यक्ती आहेस.” मला वाईट वाटावे म्हणून तो हरणाच्या पाडसाचे शिकार करत असे.

188 ते लहान पाडस, मला त्याची शिकार करणे आवडत नसे. म्हणून तो म्हणाला... जर नियम पाडसाची शिकार करण्याला योग्य म्हणत असेल, तर ते योग्यच आहे, पण मौजेसाठी त्याची शिकार करू नये. अब्राहामाने वासरू कापले व देवाने ते खाल्ले. आणि ते जर योग्य असेल हे आता हे प्राण्याच्या आकारमानावर अवलंबून नाही. पण त्यांना मारण्यात काही हरकत नाही, पण मतलबी वागणे, हे माझ्यासाठी कोणाचा तरी खून करण्यासारखेच आहे. मला वाटते की त्या छोट्या प्राण्याने जगले पाहिजे. जर तुम्हाला त्याची गरज असेल, ठीक आहे, जर नियम तुम्हाला तसं करू देत असेल, तरी ठीक आहे. तुम्हाला ठाऊक आहे की, मी सात वर्षे संवर्धन अधिकारी होतो...त्याच वेळेला मी मी बॅप्टिस्ट मंडळींमध्ये सेवकाई करीत होतो.

189 तर हा व्यक्ती खूपच क्रूर होता, एका वर्षांनी मी जेव्हा तेथे पुन्हा गेलो, तेव्हा त्यांनी तर एक—एक लहानशी शिटी बनवली होती.

190 आता मी हे सर्व बॅप्टिस्ट लोकांना उद्देशून बोलत नाही, पहा. नाही, माझा तसा बोलण्याचा उद्देश नव्हता. मी...मी तेव्हा बाहेर कामासाठी जात नसे. परंतु आता माझी काम करण्याची इच्छा आहे. मी मी सुवार्तेचे काम करण्या अगोदर इतर कामे करत असे व मी कधी कुणाकडून ही अर्पण स्वीकारले नाहीत, पहा. हे सत्य आहे. पहा? परंतु मी—मी कोणाकडे एका पैशाची देखील मागणी केली नाही. मला—मला माझे जीवन अशाप्रकारे जगायचं होतं की जेव्हा मी शमुवेला प्रमाणे उभा राहून म्हणू शकेन, “मी तुम्हाला देवाच्या नावात कधी अशी कोणती गोष्ट सांगितली जी पूर्ण झाली नाही? मी कधी तुम्हा कडून, तुमच्या मिळकतीतून पैसा घेतला काय?”. पहा हे खरे आहे. ती म्हणाली, “नाही तू घेतला नाहीस.” परंतु त्यांना त्यांचा राजा कोणत्याही प्रकारे हवा होता, म्हणून—म्हणून सर्व गोष्टी अशाप्रकारे घडल्या असतील कदाचित जशाप्रकारे ते नेहमी घडतात.

191 परंतु मला हा लहान व्यक्ती खूप आवडत असे अन् एके दिवशी मी तिकडे त्याच्याकडे गेलो. आणि त्यांनी एक लहानशी शीट्टी बनवली होती ज्यामधून हवा फुकल्यावर, एका लहान हरणाच्या पाडसाचा आवाज येत असे, जसे काय ते आपल्या आईसाठी रडत आहे. तर आता तो मला म्हणाला, “बिली, मला तुला काही दाखवायचे आहे.” आणि मग त्यांनी ही लहान शीट्टी काढून तो ती वाजवू लागला.

मी म्हणालो, “तु असे करू नकोस.”

192 आणि तो मला म्हणाला, “तू पुन्हा तेच म्हणत आहेस. ते तुझ्यापासून निघून जाणार नाही, जाईल काय?”.

आणि मी त्याला म्हणालो, “नाही, श्रीमान. मला असं करणे आवडणार नाही.”

193 तर मग आम्ही—आम्ही शिकारीला गेलो आणि तो हंगामाचा शेवटचा भाग होता. मला जाणे गरजेचे होते...आणि इथे असलेले शिकारी, तुम्ही जाणता, सफेद शेपटीचा हरिण कसा असतं. जेव्हा त्यांच्यावर कोणी हल्ला करते तेव्हा ते घाबरून जाते व त्यामुळे ते पळू शकत नाही. आणि म्हणून त्यांची शिकार होते. आणि तिथे बर्फाचा लहानसा थर जमला होता...ज्याला आम्ही दक्षिणेकडे स्किफ म्हणतो जे की चार ते पाच इंच असते, व आपण त्यावरून सहज चालू शकतो. आणि आम्ही अशाच प्रकारे अर्धा दिवस चाललो आणि माझ्या मनात विचार आला...

194 आम्ही एका—एका लहानश्या थर्मास मध्ये गरम चॉकलेट घेतले होते, जे की शक्तिवर्धक आहे व सँडविच देखील. आणि आम्ही नेहमी तेथे तळ देत असू. आम्ही जेव्हा डोंगरांचा माथ्यावर जात असू, तेव्हा तो एका बाजूने जाऊन मी दुसऱ्या बाजूला जात असे व रात्रीचे वेळी पुन्हा तंबू मध्ये परतत असू. माझ्या मनात विचार आला... तेव्हा सुमारे अकरा वाजले असतील, व असेच काही, व तो तेथे एका बर्फाच्या कपारीत बसला होता, जिची रुंदी एका खोलीच्या दुप्पट असेल. आणि तो तेथे बसला. आणि मी विचार केला की बहुदा आम्ही तेथे जेवण करणार असू, आणि म्हणून मी माझे जेवण बाहेर काढू लागलो.

195 आणि त्यांनी ती लहानशी शिटी बाहेर काढली, की जी तो आता वाजवणार होता. आणि हरणे हे घाबरट प्रकारचे प्राणी आहेत, जे की शिकारीच्या हंगामात झाडाझुडपाच्या खाली लपून बसत असतात. कारण त्यांना जगायचं असतं. आणि त्यांनी—आणि त्यांनी तिला शिटी वाजवण्यास सुरुवात केली. आणि जेव्हा तो ते करू लागला, तेव्हा तेथे समोर एक मादा हरिण लहानशा जागेत उभी राहिली. आता ही मादा हरीण एक आई होती व ती उभी राहिली. आणि मी तिच्याकडे बघितलं. ती खूप सुंदर होती व तिचे मोठाले कान व तपकिरी रंगाचे मोठाले डोळे होते. आणि—आणि त्या पाडसाचा शोध घेत होती.

196 आणि त्यांनी माझ्याकडे पाहिले, एका *विशिष्ट* प्रकारे. मी विचार केला, “तू असं करणार नाहीस, भाऊ, खचितच तू हे करणार नाहीस.” आणि त्यांनी आपल्या बंदुकी मध्ये गोळी भरली. आणि तेव्हा त्याचा नेम चुकला.

197 आणि मी पुन्हा पाहिले तेव्हा त्यांनी पुन्हा एकदा शिटी वाजली. आणि ती माता हरीण पुन्हा एकदा त्या लहानशा जागेच्या तोंडापाशी उभी राहिली, व हे दिवसात 11 चा सुमारास घडत होते. आता हे खूप विचित्र होते. ते शिकारीच्या हंगामात अशाप्रकारे ह्या वेळेला बाहेर येत नसत. ती तिथे आली. का? कारण ती—ती एक आई होती. तिच्या स्वभावात एक आई होती. ती हृदयाने एक आई असून तिचं पाडस संकटात होते. आणि ते आपल्या आईला पुकारत होते व ती त्या पडसाचा शोध घेत होती.

198 मी विचार केला, “कधी तर तू इतका क्रूर नाही आहेस, की एका बाळाच्या शोधात निघालेला आईस मारशील!” त्याने माझ्याकडे बघितले, आपल्या पाली सारख्या डोळ्यातून एका *विशिष्ट* प्रकारे. आणि त्यांनी—आणि त्यांनी आपली बंदूक घेऊन ती त्या दिशेने रोखून धरली. मी विचार केला, “अरेरे खचितच हा हे करणार नाही.” आणि ती धाडसी आई तेथे चालत होती, उभी होती!

199 आणि जेव्हा त्याने बंदुकीचे खीळ वरती खाली केली, तेव्हा त्या हरणाने ती खीळ ऐकली व त्याकडे फिरून तिने पाहिले की तिथे एक शिकारी होता. त्यांनी अशाप्रकारे बंदूक रोखली होती, व त्याचा नेम तिच्या निष्ठावान हृदयावर होता! मी विचार केला, “ती मोठाली गोळी, तिचे हृदय बाहेर काढून जाईल.” मी विचार केला, “तू हे कसं करू शकशील? एक आई आपल्या पाडसाला शोधत आहे...तिच्या बाळाचा आवाज काढून तिला तू फसवत आहेस. तू तिला अशाप्रकारे बाहेर बोलावून तिला कसे मारणार आहेस आणि तिचे निष्ठावान हृदयाचे ठोके पडत असताना, तू असं कसं करु शकशील? तू इतका क्रूर कसा असू शकशील?” आणि मी त्यांना बंदूक रोखून धरताना पाहिले. आणि ते हरीण पळण्याचा सोडून, जर की ते नेहमी करतात, ही हरीण एका जागेवर स्थिर उभी होती. तिला मरणाची भीती वाटत नव्हती. कारण तिचे बाळ संकटात होते.

200 आता बघा, या गोष्टी जाणून बुजून करत नव्हती. ती सोंग करत नव्हती. तिच्या समोर मृत्यू होता. पहा? परंतु तिला त्याचे काहीच वाटत नव्हतं, कारण ती एक आई होती. तो तिचा स्वभाव होता, आईचा; आणि ती तिच्या बाळाला शोधीत होती. तिचे बाळ रडत होते व ती त्याचा शोध घेत होती.

201 मी हे कृत्य माझ्यासमोर घडताना पाहू शकत नव्हतो. मी माझे डोके लवले. मी प्रार्थना करू लागलो. मी म्हणालो, “प्रभू येशू त्याला असे करू देऊ नकोस. त्याला असे करू देवू नकोस. तो हे कसं काय करू शकतो? तिथे एक गरीब आई उभी असून हा तिचे हृदय फोडणार काय.” ठीक आहे, मी वाट पाहिली, आणि बंदुकीतून गोळी निघाली नाही.

202 आणि मी त्याच्याकडे बघण्यासाठी वळलो, आणि त्याचा हात व बंदूक कापत होती. तो ती अजून पकडू शकत होता. आणि त्याने वळुन माझ्याकडे बघितले, आणि त्याच्या त्या तिरकस डोळ्यातून मोठाले अश्रू त्याच्या गालावरून वाहत होते. आणि आपली बंदूक उचलली व ती जमिनीवर फेकून दिली. आणि बर्फाच्या थरावर त्यांनी माझ्या विजारीचा पाय पकडला. तो म्हणाला, “बिली, माझ्याबाबतीत हे खूप झाले, हे खूप झाले. मला येशूकडे ज्याविषयी तू म्हणतोस त्याच्याकडे घेऊन चल.”

203 त्याच्यासोबत काय झाले? त्याने काहीतरी खरं पाहिलं ज्यामध्ये सोंग नव्हतं. ओ, जर आपण त्या हरिणी आईसारखे ख्रिस्ती असतो. पहा?

204 तरी येशू म्हणाला, “काय आई आपल्या स्तन चोखणाऱ्या बालकास विसरेल काय? हो, हे शक्य आहे. परंतु मी तुम्हाला कधी विसरणार नाही. तुमची नावे माझ्या तळहातावर कोरली आहेत.”

या आपण प्रार्थनेसाठी आपल्या माना झूकवूया, काही क्षणाकरिता.

205 ह्या वेळेला किती लोक दैवी उपस्थितीचा अनुभव घेत आहेत, जसजशी आपण घाई करत आहोत, व जे म्हणतील, “देवा आज मी प्रार्थना करतो की मला त्या हरणी आईसारखे ख्रिस्ती बनव, जेणेकरून मी निडर बनेन. मला तुझ्यावर अशाप्रकारे प्रेम करण्यास शिकव ज्याप्रमाणे त्या हरणी आई चे आपल्या मुलावर प्रेम होतं”? तुम्ही आपले हात उभारून म्हणा...देव तुम्हाला आशीर्वाद देवो. देव तुम्हाला आशीर्वाद देवो. तुमच्यातून त्या प्रकारचे प्रेम दिसू द्या.

206 हे आमच्या स्वर्गातील पित्या, आज येथे बसलेले अनेक आहे, आणि हो, ज्यांनी आपल्या हात वरती केले असे शंभरानी लोक आहेत की त्यांना आज तो अनुभव घ्यायचा आहे. ती हरिणी आपलं मातृत्व व धाडस दाखवू शकत होती कारण ती एक माता होती. तिचा स्वभाव एका आईचा होता. हे देवा, तू आम्हाला ख्रिस्ती बनव, तू आमचा स्वभाव ख्रिस्ती बनव, प्रभू. असं नाही की कोणतं तरी सोंग पांघरून आणि म्हणावं, “मी *अमुक* आणि *अमुक* इकडला आहे,” परंतु आम्हाला हृदयातून ख्रिस्ती बनव. तुझी वचने आणि तुझे प्रेम आमच्या हृदयामध्ये रुजव, हे प्रभो, की जेणेकरून आम्ही जगाला ख्रिस्तीत्व व दैवी प्रेम प्रगट करू शकू कशाप्रकारे त्यादिवशी त्या हरिणीने मातृत्व विषयी दाखवले. हे पित्या, आज आम्हाला हि दे. ज्यांनी आज हात वरती केले आहेत त्या सर्वांसाठी मी आज मी प्रार्थना करतो. त्यांच्या जीवनात तो अनुभव घडू दे.

207 कदाचित येथे आज असे लोक असतील की त्यांना चर्चला जाण्या व्यतिरिक्त दुसरे काही माहित नाही. त्यांनी खरं असं काही कधी बघितलं नसेल. परंतु शलमोनापेक्षा महान असा इथे कुणी आहे, खुद येशू, जो की काल, आज व युगानुयुग सारखाच आहे. येथे आज रात्री प्रार्थनेच्या रांगेत उभे राहिलेले प्रेक्षक, देवाचे प्रेम व देवाचे सत्य आहोत, व जाणोत की त्याचे वचन सत्य आहे, आणि तो मेला नाही. तो सदासर्वदा जिवंत आहे. आणि हे बघून त्यांनी आपलं जीवन तुझ्यासमोर शरण येऊन तुझी मुले बनावे, आणि त्यांच्या हृदयात प्रेम उत्पन्न कर जेणे द्वारे ते मृत्यूला देखील न भिता सामोरे जातील.

208 ज्याप्रमाणे दावीद म्हणाला, “जरी मी मृत्यूछायेच्या दरीतून जात असलो, तरी मी कसल्याही अरिष्टाला भिणार नाही.” अशाप्रकारे ती माता हरिणी जंगलात चालत होती, जशी काय मृत्यू छायेच्या दरीतूनच ती जात होती, व ती उघड्या मैदानावर होती. आणि दावीद म्हणाला, “मी मृत्यूछायेच्या दरीतून जाईन. मी कोणत्या अरिष्टाला भिणार नाही, कारण तू माझ्या बरोबर आहेस.” देवा, आमची हीच इच्छा आहे. प्रभू आज ते आम्हाला तू दे. ही मागणी मी येशूच्या नावात मागतो. आमेन.

209 प्रभु तुम्हा सर्वांना आशीर्वादित करो. तुमचा अधिक वेळ घेतल्याबद्दल मला क्षमा करा. मी स्वतः विषयी असं पाहतो, की मला बोलल्याशिवाय राहवत नाही. परंतु आता आपण आजाऱ्यांसाठी प्रार्थना करणार आहोत. मी तुम्हाला विनंती करतो तुम्ही काही क्षणासाठी आपल्या जागेवर बसून घ्यावे. मी आज रात्री तुम्हाला आरोग्य विषयी प्रार्थनेचे कबूल केले होते. मला ते आता करावयाचे आहे. आणि मला ठाऊक आहे की आपण हे आधीच संपवायला हवे होते, आता आपण ते करत आहोत...आणि—आणि इकडची व्यवस्था पाहणाऱ्यांची, मी तुमच्या दयेबद्दल आभारी आहे, श्रीमान, की तुम्ही इथली वीज

घालवली नाही. मी प्रार्थना करतो की देव तुमच्या जीवनात देखील प्रकाश पाडो जर आता तुमच्यात तो नसेल, व एके दिवशी तुम्हाला गौरवात घेऊन जाओ.

210 आता बिली कुठे आहे? कशाप्रकारे पत्रे वाटण्यात आली आहेत? एक पासून शंभर पर्यंत काय. ठीक आहे. शक्यतो आम्ही—आम्ही त्यांना मिसळतो. आणि जेव्हा तो मुलगा प्रार्थना पत्रे वाटतो, त्याआधी तो ती सर्व मिसळतो, व त्यानंतर तो तुम्हाला हवे असलेले प्रार्थना पत्र देतो, पहा. तर ती सर्व मिसळलेली असतात. आम्हाला ठाऊक नसते आम्ही कोणत्या क्रमांका पासून सुरुवात करणार आहोत. तिथे असलेल्या अनेक जण, यापूर्वीच्या सभेत होते. हे अशासाठी की, प्रार्थना पत्रे वाटणारा मुलगा ते तुम्हाला विकू शकणार नव्हता, आणि आम्ही एके वेळेस एका व्यक्तीस हे करताना पकडले देखील होते. आम्ही असं करू शकत नाही. त्याला ही तसं करता येणार नाही.

211 आता कोणी म्हणेल, "आता तु मला हे पत्र दे व मी लगेच रांगेत उभा राहतो?" त्या विषयी त्याला माहिती नसते. सर्वप्रथम ती सर्व मिसळलेली असतात, आणि तुम्हाला—तुम्हाला फक्त एकच पत्र देण्यात येते. आणि त्याला हे ठाऊक नसतं व आम्हालाही त्याविषयी इथे येईपर्यंत ठाऊक नसतं. शक्यतो मी या रांगेतली अमुक–अमुक व *त्या* रांगेतले अमुक–अमुक असे निवडतो, व *त्या*द्वारे मला काही उत्तर मिळते, व कधीकधी कुठूनही सुरुवात करतो.

212 परंतु आजच्या रात्री आपण हे सर्व वगळून, पत्र क्रमांक एक पासून सुरुवात करणार आहोत, कारण आपल्याला उशीर देखील झालेला आहे. आणि प्रार्थना पत्र क्रमांक...मी तुमचा क्रमांक बोलल्यानंतर तुम्ही आपल्या जागेवर एक एक करून उभे रहावे. जर तुम्हाला उठण्यात त्रास होत असेल, तर तुम्हाला तेथे कोणीतरी मदत करून येथे आणण्यात येईल.

213 आता येथे असे किती लोक आहेत की जे आजारी असून त्यांच्याकडे प्रार्थना पत्र नाहीत? तुम्ही फक्त प्रार्थना करा. देव तुम्हाला आशीर्वादित करो. ते ठीक आहे.

214 आता प्रार्थना पत्र क्रमांक एक उभे रहा. ते कोणाकडे आहे? हो ते तिकडे आहेत. भगिनी, काय तू इथे येऊ शकशील काय, या इथे? क्रमांक दुसरा ए, ते कोणाकडे आहे? हा ए काय आहे? क्रमांक दुसरा ए, ते कोणाकडे आहे? भगिनी, काय तू इथे येऊ शकशील काय, या इथे? क्रमांक तिसरा. तुम्ही इथे या. चौथा. श्रीमान तुम्ही इथे या. पाचवा, हे पत्र कोणाकडे आहे, काय तू आपला हात वर करशील काय? एक भगिनी. सहावा. असे केल्याने रिंगण बनण्यापासून थांबवता येईल, तुम्हाला ठाऊक आहे...की हे एक देऊळ आहे. सहा. सात. ठीक आहे, क्रमांक आठ. ठीक आहे, आपापल्या जागेवर उभे रहा. [टेपवर रिक्त स्थान—सम्पा.] आठ, नऊ, अकरा.

215 मला इथे क्रमांक अकरा दिसला नाही, तो कोणीतरी बहिरा असावा. काय तुम्ही आपल्या शेजाऱ्याची पत्र तपासू शकता काय? अकरा, भगिनी तुझ्याकडे अकरा आहे काय? काय तुम्ही आपले हात उभारू शकता? ओह, ती तर बहिरी आहे. तुम्ही तिच्या पत्रावर लक्ष द्या, जेव्हा मी तिचे पत्र पुकारेन. ठीक आहे, अकरा. ते तुम्हाकडे आहे, अकरा. बारा. प्रार्थना पत्र क्रमांक 12, ती भगिनी. तेरा. प्रार्थना पत्र क्रमांक 13. काय तुमचे प्रार्थना पत्र क्रमांक 13 आहे? [एक भाऊ ब्रदर ब्रॅन्हम सोबत बोलतो.—सम्पा.]. ठीक आहे, तिथे त्या भगिनी कडे बघा. भगिनी, ज्या तुम्ही निळी टोपी घातली आहे, तुमचा क्रमांक तेरा की...बारा आहे. आणि *तुमच्या*कडे 13 आहे, तेरा? क्षमा करा. चौदा. ठीक आहे. पंधरा. मला वाटते की इतक्याच लोकांना आता आपण या समयी घेऊ शकतो, तेथे रांगेत दाटी तर होत नाही ना.

216 आता, इथे असलेले इतर जण, ज्याकडे प्रार्थना कार्ड नाहीये. तुम्हा मध्ये या सभेत प्रथमच आलेला असं कोणी आहे काय? काय तुम्ही आपला हात उभारू शकता. ठीक आहे, तुमच्या इथे येण्याबद्दल आम्ही आनंदी आहोत. काय तुम्ही यापूर्वी प्रार्थना सभेत होतात काय? आपले हात उभारा, तुम्ही जर यापूर्वी प्रार्थना सभा मध्ये उपस्थित होतात. ठीक आहे.

217 आता सर्वांना हे ठाऊक आहे की आम्ही स्वतःला आरोग्य देणारे समजत नाही. आम्ही—आम्ही लोकांना बरं करू शकत नाही. येशूने हे आधीच करून ठेवले आहे. परंतु आम्ही हे कबूल करतो की तो काल आज व युगानुयुग सारखाच आहे. आणि आज जर आपण त्याला जाणून, आपल्या मध्ये उपस्थित असलेले पाहू की, येशु येथे आहे. जर तो तिथे उभा राहिला असता, व तुम्ही त्याला पाहिले असते, तर काय तुम्ही विश्वास ठेवला असता? तुम्ही ते केले असते. परंतु तुम्ही इथे पहा तो तसे करणार नाही. जेव्हा तो येतो, तेव्हा समय समाप्त होतो. तेव्हा तो आमच्यासाठी येत आहे. परंतु पवित्र आत्मा रुपी मनुष्य…

218 आता येथे कोणी आपल्या हातामध्ये खिळयाचे व्रण व त्याच्या तोंडावर काटे लावून कोणी आला. तर तो एक नक्कल करणारा असेल. तो एक ढोंगी असेल. कोणीही हे करू शकतो. परंतु त्या मध्ये देखील, जर ख्रिस्ताचे जीवन उत्पन्न झालेला नसेल, तर तो ख्रिस्त नाही. पहा? आता तेथे ख्रिस्ताचे जीवन असलं पाहिजे.

219 आणि बायबल असे म्हणते, “आपण आपल्या दुर्बलतेच्या भावनेतून ज्याला स्पर्श करू शकतो असा तो महायाजक आहे.” आता ज्या तुम्हाकडे प्रार्थना पत्रे नाहीत, आता आपण ही गोष्ट करू या, आणि आम्ही प्रार्थना करीत असताना तुम्ही म्हणा, “हे महान याजका, प्रभू येशू, तूच माझा प्रभू आणि रक्षण कर्ता आहेस!”. जर तुमच्या जीवनात कुठे पाप असेल, तर तुम्ही ते कबूल करा, त्याला बाहेर काढा.

220 आणि जे तुम्ही प्रार्थना रांगेत उभे आहात, तुम्ही देखील असंच करा, कारण तुम्ही हे पक्के समजा की ते इथे प्रकट केले जाईल. पहा? जर तुम्ही काही चुकीचे केले असेल, तर तुम्हाला इथे फलाटावर बोलाविले जावे असे वाटत नसेल, तर तुम्ही रांगेतून बाहेर व्हा. कारण, किती लोकांना हे माहित आहे? [मंडळी आमेन म्हणते.—सम्पा.]. हे, श्रीमान. ते इथे प्रकट केले जाईल. तर तुम्ही ते रक्ताखाली घेऊन या समजले? आणि—आणि म्हणा, “माझ्या—माझ्या पापापासून मला क्षमा करून मला तुझ्यावर विश्वास करण्यास साहाय्य कर. मी आजारी आहे, प्रभू, व मला तुझा गौरव होताना बघायचा आहे.” पहा, देव तुम्हाला रोग मुक्त करण्यासाठी आरोग्य देत नाही. पहा? नाही. तो ते देवाच्या गौरवासाठी करतो. तर आपण आपले पाप व अविश्वास कबूल केले पाहिजे.

221 आणि तिथे तुम्ही पाहता की, एक पिता आपल्या फेफरे करी मुलाला घेऊन आला, ज्याला त्याचे शिष्य बरे करू शकले नव्हते. येशू त्याला म्हणाला, “जर तू विश्वास ठेवशील, तर मी हे करू शकेन.”

222 तो म्हणाला, “प्रभो, मी विश्वास करतो. माझ्यातला अविश्वास दूर करा.” पाहा? तो जोरात रडला कारण त्याला त्याची गरज होती.

223 आता तुम्ही तिथे देवाकडे प्रार्थना करून म्हणा, “हे देवा, ब्रदर ब्रॅन्हम मला ओळखत नाहीत. तो मला ओळखत नाही. पण तुला ठाऊक आहे की तू मला ओळखतोस, तर आता मला तुझ्या कपड्याला स्पर्श करू दे. मला तुझ्या झग्याला स्पर्श करू दे, कारण तू महा याजक आहेस. आणि आता तू ब्रदर ब्रॅन्हमच्या मुखाद्वारे बोल, जशाप्रकारे पृथ्वीवर त्या स्त्रीने तुझ्या झग्याला स्पर्श केला तेव्हा तू बोलला होतास. कारण तू असा महा याजक

आहेस की ज्याला आम्ही आमच्या दुर्बलतेच्या अवस्थेत देखील स्पर्श करू शकतो, तोच जो काल, आज व युगानुयुग सारखा आहे, आणि त्याला तशाच प्रकारे वागावे लागेल."

224 त्या दिवशी किती लोकांनी विश्वास केला असेल, ज्या दिवशी त्या स्त्रीने त्याला स्पर्श केला व ती बरी झाली? तुम्हाला वाटते काय लोकावर त्या गोष्टीचा प्रभाव पडला असेल? पहा, हो—हो कदाचित पडला असेल. आता, असं घडलं असेल. तर काय ह्या युगातल्या आपण परराष्ट्रीय लोक, येशूचे किती आभार मानले पाहिजेत. आपण पण कितीतरी जास्त आभारी असले पाहिजेत. पहा?

225 आणि तिथे या लहान बाईने त्याला स्पर्श केला व तेथून निघून जावून, गपचूप बसली. येशू म्हणाला, "जरा एक क्षण थांबा. मला कोणी स्पर्श केला? मला कोणी स्पर्श केला?"

226 काय, पेत्राने त्याचा निषेध करून म्हटले, "प्रभू," दूसऱ्या शब्दात सांगायचं झालं तर, "हे तुझं बोलणे शहाण्याप्रमाणे नाही. लोकांच्या मनात तुझ्याविषयी उच्च विचार असून ते तुला एक संदेष्टा मानीत आहेत. तर आता तू असे कसे म्हणू शकतोस की 'मला कोणी स्पर्श केला,' आणि इथे सर्वच जण तुला स्पर्श करत नाहीत काय?"

227 तो म्हणाला, "हो हे सत्य आहे, परंतु, काहीतरी विचित्र असे, तो एक वेगळ्या प्रकारचा स्पर्श होता. पहा? माझ्या अंगातून सद्गुण बाहेर गेला, शक्ती निघून गेली.".

228 आणि तो सभोवार बघू लागला व त्याला ती स्त्री दिसली, तिने त्याला सांगितले की तिला रक्तस्त्रावाचा आजार आहे. आणि तिला आपल्या शरीरामध्ये अशी जाणीव झाली की तो आता थांबला आहे, कारण तो म्हणाला, "तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे." पहा?

229 आता तो तोच महायाजक आहे. आणि आता जर तुम्ही त्याला स्पर्श कराल तर!

230 आता, तुम्ही मला स्पर्श केल्याने तुमचे काही चांगले होणार नाही. मी तर तुमच्या पतीसारखा, किवा भावासारखा, किंवा पित्यासमान आहे. जर तुम्ही कोण एका पाळकाला स्पर्श केलात तरीदेखील ते तशाच प्रकारे आहे. पहा? परंतु त्याला स्पर्श करणे, तो तसा एकच आहे. मी तुम्हाला ओळखत नाही. मी तुम्हा बद्दल काही जाणत नाही. मी त्यांना बरे करू शकत नाही. जर मी करू शकलो असतो, तर ते मी केले असते. पण मी ते करू शकत नाही. त्याने जे केले ते मी पुन्हा करू शकत नाही.

231 आता तो जर येथे उभा असता व त्याने तुम्हाला आपल्या उपस्थिती विषयी प्रकट केले असते. ह्याविषयी जरा विचार करा. आता आपल्या सर्वांना ठाऊक आहे की आपल्यात काहीतरी आता घडणार आहे. त्याची आपल्याला चाहूल लागली आहे.

232 आता तेथे, चांगले व वाईट प्रकारच्या गोष्टी आहेत. "हे *अशा*प्रकारे *असाय*ला हवे," हे सांगण्याचे देखील अनेक प्रकार आहेत. परंतु तेथे एक खरा मार्ग देखील असणे आवश्यक आहे.

233 आणि जर आपण विचार केला की तोच देव, जो न्यायाच्या दिवशी जगाचा न्याय करणार आहे, आणि तो जर आता तुम्हामध्ये येथे येऊन उभा राहिला तर ते कसे असेल! "जिथे दोघे किंवा तिघे माझ्या नावात एकत्र जमले आहेत, तेथे त्यामध्ये मी उपस्थित आहे. पहा, तीच कृत्ये जी मी कधी काळी केली होती." तो आता पुन्हा करेल. त्याने तसे अभिवचन दिले आहे. "तुम्ही माझे साक्षी व्हाल, येरुशलेमेत, यहुदियात, न्यूयॉर्क शहरांमध्ये, पाहा, व सर्व जगामध्ये."

234 आणि आता तुम्ही सर्वजण शांत बसून प्रार्थना करा. आपल्या पूर्ण हृदयाने विश्वास ठेवा. कोणतीही शंका बाळगू नका. तुमच्या पूर्ण शरीराने (जीव, शरीर व आत्मा) विश्वास ठेवा आणि देव तुमची इच्छा पूर्ण करेल.

आता आपण आपल्या माना काही क्षणासाठी झूकवूं या.

235 आकाश आणि पृथ्वीच्या महान निर्माणकर्त्या, आजच्या रात्री मी इथे उभा राहून जे काही बोलत आहे त्याचं काहीच महत्त्व नाही, जर तू खाली उतरून ते सिद्ध केले नाहीस. आम्ही खूप काही ऐकले आहे आणि लोकांनी देखील खूप काही ऐकले आहे. परंतु आता, हे पित्या, तुझ्या मुखातून एक शब्द, सर्व काही यथास्थित करेल. आणि आम्ही त्याकडे पाहत आहोत.

236 आता, आम्हाला ठाऊक आहे की तू फक्त मनुष्याच्या मुखाद्वारे बोलतोस. असेच एके दिवशी उभे राहून, तयार झालेल्या पिकाकडे बघून म्हटले, "पिक कापणीसाठी तयार झाले आहे," व म्हटले, "पिकाच्या धन्याने अजून कामकरी पाठवावे म्हणून प्रार्थना करा." आणि तू तर पिकाचा धनी आहेस. परंतु आपल्या आखलेल्या कार्यक्रमाशी तू एवढा जोडलेला आहेस, तू आणि तुझे लोक, तुम्ही त्या व्यतिरिक्त काही वेगळं करीत नाही.

237 देवा, आता मी प्रार्थना करतो. आणि आता जर तू फक्त मला अभिषिक्त करून ह्या जमलेल्या लोकांना विश्वास ठेवण्यासाठी अभिषिक्त केले नाहीस तर त्याचा काही फायदा होणार नाही. तर आपल्याला एका गटाचे, भाऊ व भगिनी असे व्हावे लागेल. हे देवा मी प्रार्थना करतो की तू आम्हाला असे अभिषिक्त कर की त्याद्वारे आता आम्ही अनंत काळाच्या या बाजूस असताना, गौरवी येशू ख्रिस्त, जो शलमोनापेक्षा श्रेष्ठ आहे त्याला पाहू शकू. हे आम्ही त्याच्या नावात मागतो. आमेन.

238 आता तुम्ही आदर भावाने याकडे यावं अशी माझी इच्छा आहे. [पियानो वादक *फक्त विश्वास ठेवा* वाजवू लागतो.—सम्पा.]

239 कधीतरी, जर मी मेलो, जेव्हा ते मला कब्रेत पुरत असतील, तेव्हा ते हेच गीत वाजवतील, तुम्हाला माहित आहे. जेव्हा तुम्ही ऐकाल कि मी निघून गेलो आहे, तेव्हा तुम्ही त्यावर विश्वास ठेवू नका की मी मेलो आहे. कारण मी मेलो नाही. जर तुम्ही रेडिओ वर हे गीत ऐकाल किंवा वृत्तपत्रांमध्ये कुठे हे गीत वाचाल, तेव्हा क्षणभर थांबून तुम्ही हे गीत गा (कराल ना?) आणि तुम्ही हे आठवा, की "फक्त विश्वास ठेवा."

240 आता येथे जमलेल्या व रांगेमध्ये उभे असलेल्या कोणा एकाला मी ओळखीत नाही. जर येथे जमलेला प्रत्येक जण माझ्यासाठी परका आहे, आणि तुम्ही जाणता की आम्ही एक दुसऱ्यांना ओळखत नाही, तर मला त्याचे दुखणे देखील ठाऊक नाही. तुम्ही आपले हात उभारून ह्या गोष्टीस अनुमोदन द्या. आता तुम्ही कदाचित आजारी असाल; मग कोणी नसेल देखील. मला ठाऊक नाही. कोणी आर्थिक संकटात असेल, कोणी घरगुती संकटात असेल. मला—मला ठाऊक नाही.

241 तू आता ती लहान भगिनी जर येथे जवळ येईल तर चांगला होईल. आभारी, ठीक आहे. आता इथे आलेली भगिनी माझ्यापेक्षा वयाने लहान आहे. आमच्या जन्मांमध्ये कदाचित खूप वर्षांचा अंतर असेल, मैलाचा अंतर असेल. ही आमची भेटण्याची पहिलीच वेळ आहे. आता ती येथे कोणत्यातरी कारणासाठी आलेली आहे. ते मला—मला माहित नाही. ती कदाचित आजारी असेल. मला—मला तिचे संकट माहित नाही. तिचे जे काही संकट असेल, हे देवाला ठाऊक आहे. आणि जर देव ते आज प्रकट करील तर तिला समजेल की हे सत्य आहे किंवा नाही.

242 आता ती लहान बाई जर म्हणेल, “ब्रदर ब्रॅन्हम, मी भयंकर आजारी आहे. माझ्या—माझ्या…पोटा विषयी मला खूप चिंता आहे. मला—मला आकडी येते किंवा—किंवा असा कोणता आजार आहे.” बाहेरून ती जरी सुदृढ दिसत आहे पण ह्या गोष्टी कडे बघून तुम्हाला ते कळू शकत नाही.

243 आणि जर ती असं म्हणेल, तर मी तिला असं म्हणेन, “बायबल असे म्हणते, ‘की तुम्ही आजारयांवर हात ठेवा.’” जशाप्रकारे ब्रदर रॉबर्ट प्रार्थना करतात तशा प्रकारे हे होईल, किंवा ब्रदर एलन जशा प्रकारे करतात किंवा आणखी कोणी करतात तसे हे होईल. ती त्यांची सेवकाई आहे. ते त्यानंतर त्यांच्यावर हात ठेवून म्हणतील, “हे सैताना, येशूच्या नावात तू हिला मोकळा कर. हे सैताना, मी तुझा निषेध करतो.” किंवा अशाप्रकारे बोलतील…आणि त्यानंतर ते म्हणतील, “जा, आता तू बरी झाली आहेस.” तर तिने त्यावर विश्वास केला पाहिजे. पहा, हे करणे योग्य आहे.

244 आता जर, तिच्यामध्ये कुठेतरी गुप्त पाप असेल तर? तर तुम्ही तिच्यावर एक घडा भर तेल जरी ओतून तिला अनेक वेळा अभिषेक केले, कितीही वर खाली उड्या मारल्या, व किंचाळले, तरी तो दुष्ट तिथेच राहील. कारण तिथे पश्चाताप न केलेले पाप आहे. तुम्ही त्याला बाहेर काढू शकणार नाही. नाही, श्रीमान.

245 परंतु आता जर का पवित्र आत्मा खाली उतरून तिला असं काही गोष्टी सांगेल, व तिला दाखवेल की हे सत्य आहे किंवा नाही, आणि तिला पुढे घडणाऱ्या गोष्टी सांगेल. जर जे “काही होते” ते योग्य होते, व जे “काही घडेल” ते योग्य घडेल. काय हे योग्य नाही काय? आता हे आमच्या प्रेमळ प्रभूची दया आहे, जो की ह्या अंतिम काळात आपल्या वधूला एकत्रित करीत आहे, तुम्ही पहा, त्याने आपल्याला कोणते अभिवचन दिले होते. जर त्याने आज येथे अशी गोष्ट केली, तर किती जण त्यावर पूर्ण हृदयाने विश्वास ठेवतील? [मंडळी म्हणते “आमेन”—सम्पा.] देव तुम्हाला तुमच्या प्रामाणिकपणाबद्दल आशीर्वादित करो. आता ही गोष्ट…

246 जर तुमची वाचण्याची इच्छा असेल…तर मी तुम्हाला दाखवतो, जर मी कोणती गोष्ट वचना व्यतिरिक्त बोललो तर तुम्ही मला ते सांगा. पहा? तर तुम्ही मला एक पत्र लिहा किंवा याविषयी कोण एका पाळकास कळवा व मला माझी चूक दाखवा. मला—मला चूक करायची नाही. मला योग्य तेच करायचे आहे, व ते वचना मधूनच करायचे आहे.

247 आता आपण हे थोडे अशाप्रकारे बघूया, आपण संत योहान याचा चौथा अध्याय पुन्हा बघूया. तिकडे एक मनुष्य व एक स्त्री प्रथम वेळेस भेटत आहेत, जशाप्रकारे आपला प्रभू व ती शोमरोनी स्त्री. ते प्रथम वेळेस भेटत होते, आणि येशूने तिच्याशी थोडा वेळ बोलून त्याला तिच्या मधला दोष सापडला. तिचा दोष होता अनैतिकता. आणि त्याने तिला तिचा दोष दाखवला आणि त्यानंतर तिने लगेच ओळखले की तो एक संदेष्टाच असणार. ती म्हणाली, “श्रीमान मला वाटते की तुम्ही एक संदेष्टा आहात.” आणखी ती म्हणाली, आम्ही जाणतो की मसीहा येत आहे. जेव्हा तो येईल तेव्हा तो अशाच प्रकारच्या गोष्टी करेल.”

येशू तिला म्हणाला, “मी तोच आहे.” पहा?

248 आता, मागील काळात जर त्यांनी अशा प्रकारे लोकांना आपल्याबद्दल ओळख दिली, तर तो आज ही तसाच आहे, तो आपल्याविषयी तशाच प्रकारे ओळख देईल. आता जर, पवित्र आत्मा तिच्याशी ह्याप्रकारे बोलेल तर तिला कळून चुकेल की हे कोणा आध्यात्मिक व्यक्तीचे काम आहे. हे कोणत्या नैसर्गिक गोष्टीतून येत नाही. हे आध्यात्मिक गोष्टीतून येते. आता ती परूश्यासारखी बोलू शकेल, “हे बालजबुबापासून आहे,” तिला ते

जशाप्रकारे वाटेल त्यावर अवलंबून आहे. किंवा ती म्हणू शकेल, “हे ख्रिस्तापासून आहे,” हे देखील तिच्या वाटण्यावर व ख्रिस्तावर अवलंबून आहे, पहा, अशाप्रकारे हे आहे.

249 आता तुम्ही भक्तिभावाने शांत रहा. मी त्या एका क्षणाची वाट बघत आहे, की जेव्हा तो अभिषेक येईल. त्याची मी उत्कंठेने वाट बघत आहे, पहा. कारण असं देखील होउ शकते तो येणारच नाही. आणि जर तो आला नाही, तर आपण आपल्या माना झुकूवू व त्यानंतर लोकांना जायला सांगू, आणि पुन्हा उद्याचे रात्री येऊन त्याला विचारू की जर तो आपल्या मध्ये येईल…त्याने मला अजुन पर्यंत कधी पडू दिले नाही. आता, जरी शंभर आणि किंवा हजारानी आणि लोक असले, तरी त्याने मला कधी पडू दिले नाही. आणि आता देखील तो मला पडू देणार नाही. मला ठाऊक आहे की तो असं करणार नाही. मला ठाऊक आहे की तो असं करणार नाही. पहा, मला ठाऊक आहे तो मला पडू देणार नाही.

250 तर, पहा, माझ्या मनात हा विचार आहे की बंद करण्याचा समय तर निघून गेला आहे. जर तुम्ही…जर तुम्ही चल बिचल व्हाल तर पवित्र आत्मा तुमच्या द्वारे काम करणार नाही, तर तुम्हाला शांत व्हावं लागेल. आता जर इथे अधिक भाडे द्यावे लागेल तर त्यां साठी मी तयार आहे. पहा. हे असंच आहे. शैताना, तू आम्हाला अजून खोटं पडू शकणार नाहीस.

251 मी आता सर्व गोष्टीचा ताबा माझ्या हातात घेऊन, येशू ख्रिस्ताच्या नावात इथे असलेल्या सर्व आत्म्यांना आदेश देतो. आता तुम्ही…

मी आता त्या लहान बाईशी बोलेन. जर पवित्र आत्मा मला त्याविषयी दाखवेल, भगिनी…

252 येशू त्या बाईशी काही क्षण बोलला ज्या द्वारे तो तिच्या आत्म्याला पकडू शकेल, पहा, की तिच्या मध्ये काय दोष आहे…मी विश्‍वास करतो की त्याने असंच केलं. पित्याने त्याला तिथे पाठवले, आणि त्याला तिथून शोमरोनास जाणे होते. परंतु तो तिथे जेव्हा आला, तेव्हा त्याला एवढीच माहिती होती, की तो आता तेथे आहे. आणि पहा तिथे ती स्त्री आली, व त्याला कळले हीच ती वेळ असेल.

253 आता पित्याने मला इथे पाठविले आहे. मी आता इथे न्यू यॉर्क मध्ये आहे व इथे तू आहेस, आजच्या रात्री ह्या फलाटावर तू प्रथम व्यक्ती आहेस. मला ठाऊक नाही, तो मला सर्व प्रकट करील. तो जर मला प्रकट करील, तर काय तू आपल्या हृदयाने पूर्ण विश्‍वास ठेवशील? काय तू त्याला स्वीकारशील? तुला ते कळेल की हे सत्य आहे किंवा नाही, पहा. तुला मी जाणत नसताना, आणि मी तुझ्यासाठी परका असताना, परंतु तुला कोणता त्रास आहे…तुला अनेक त्रास आहेत. परंतु तुझा मुख्य त्रास व ज्या विषयी तू प्रार्थना करू इच्छिते ते म्हणजे तुझा घसा. तुला घशाचा त्रास आहे. काय हे सत्य आहे? तू आपले हात उभार. काय तुम्ही विश्‍वास ठेवता? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.]. आता एक क्षण थांबा. आता असे करणे योग्य असेल.

254 आता तुम्ही म्हणाल, “ब्रदर ब्रॅन्हम तुम्ही अनुमान लावला असेल.” नाही, मी कधीच करत नाही. मी ते लोकांमधूनच ऐकतो, “त्याने अनुमान लावला.”

255 आता एक क्षण थांबा, आपण तिच्याशी एकांतात बोलूया. काय तू भानावर आहेस की इथे काहीतरी घडते आहे, पहा.

256 आता मी तुम्हा लोकांना विचारतो. किती लोकांनी ते चित्र ज्यामध्ये प्रभूचा दूत व तो प्रकाश पाहिला आहे? जे की वॉशिंग्टन डीसी मध्ये लावलेले आहे. तेच चित्र आज तिच्या

भवती देखील टांगलेले आहे. पहा? काय तुम्हाला हे दिसत नाही काय? हे अशा प्रकारे दिसते...कारण इथे अभिषेक आला आहे. मी ते बघू शकतो, पहा. ते इकडे आहे.

257 हो ते इथे आहे. हो, तिला घशाचा त्रास आहे. ती त्याविषयी चिंतीत आहे. आणि आता तिच्या घशात एक—एक गाठ आहे. हे अगदी बरोबर आहे. हेच केवळ नव्हे, परंतु तुला थायरॉईड ग्रंथीचा देखील त्रास आहे ज्यामुळे तू चिंतित आहेस. काय हे सत्य आहे? ठीक आहे. काय तू आता हे विश्वास करतेस की इथे उभा असणारा येशू ख्रिस्त तुला ओळखून तुझ्याविषयी सर्व काही जाणतो? काय तू त्याला आपला आरोग्य दाता म्हणून मानितेस?[ती भगिनी म्हणते, “हो मी मानते.”—सम्पा.] तर आता जा आणि प्रभूच्या नावात बरी हो.

रांगेत असणाऱ्या तुम्ही सर्वांनी बघा. त्याला सर्व काही ठाऊक आहे.

258 हे तरुण स्त्रिये, तू कशी आहेस? आता तू थोडी घाबरलेली आहेस, कारण जेव्हा तू इथे वरती आलीस, तेव्हा तो प्रकाश आता तुझ्यावर आला आहे. पहा? आणि ती शुद्धीवर आहे. आता इथे बघा. मी—मी ह्या स्त्रीला ओळखीत नाही. परंतु ती आता माझ्यासमोर उभी आहे, एक तरुण स्त्री म्हणून. आणि आता जर पवित्र आत्मा मला तुझी देवा कडून असलेली इच्छा प्रगट करील तर! तू तर एक ख्रिस्ती आहेस. आणि जर तू तशी नसती, तर त्याने मला तसे सांगितलं असते. परंतु तू तर एक ख्रिस्ती आहेस, एक खरी ख्रिस्ती. आणि जर—जर त्याने मला तुझी देवाकडून असलेली इच्छा प्रगट केली, तर काय तू मला त्याचा संदेष्टा किंवा दास म्हणून मानिशील? [ती भगिनी म्हणते, “आमेन.”—सम्पा.]. तुला ठाउक आहे की मी तुझ्यासाठी परका व्यक्ती आहे.

259 आता तू तुझ्यासाठी इथे आलेली नाहीये. मी एक वृद्ध महिला बघतोय, बरोबर, ती तुमची आई आहे. [ती भगिनी म्हणते, “हो.”—सम्पा.] ओह्. आणि ही इथे नाही आहे. आणि ती...आणि तू तिच्या बाबतीत खूप चिंतित आहेस. ही स्वतःदेखील चिंतित आहे, खूपच, कारण तो कर्करोग आहे. काय तुला तीची सद्यस्थिती ठाऊक आहे. हे तरुण स्त्री, काय तू विश्वास करतेस, की हे सर्व पवित्र आत्माचे कार्य आहे? [“आमेन.”]. आता तु आपल्या पाकिटा मधला रुमाल घेऊन घरी जा, जेव्हा तू आपल्या आईला भेटशील, किंवा तू तो तिच्याकडे पाठवून दे व तिला या रात्रीच्या सभेच्या आठवणीसाठी तो रुमाल पाठवून दे. आणि तू आपल्या हृदयात शंका करू नकोस. परंतु विश्वास कर कि येशू ने... [भगिनी ब्रदर ब्रॅन्हमशी काहितरी बोलते.]. हो आणि तो अंधकार तिला सोडून जाईल व ती...तू ठीक होशील. तू आता जा आणि प्रभू तुला आशीर्वादित करो. माझ्या भगिनी, देव तुला आशीर्वादित करो.

260 काय तुम्ही आपल्या हृदयाने ह्यावर विश्वास कराल? आता तुम्ही शंका करू नका. तर विश्वास ठेवा.

261 आता एक क्षण थांबा, क्षमा करा. इथे काहीतरी घडलं. इथे अजून कोण तरी प्रगट झाला. आता ज्या स्त्रीसाठी आपण प्रार्थना केली ती कुठे आहे? ओ, ते बरोबर आहे. एक क्षण थांबा. नाही, एकच क्षण, पवित्र आत्मा...इथे अजून कोण तरी आले आहे. पहा, तो एक प्रकाश आहे आणि...

262 होय, हीच ती कृष्णवर्णीय स्त्री ही इथे बसलेली आहे. होय, तू तिथे बसून आरोग्यासाठी प्रार्थना करीत होतीस. आता तू माझ्यासाठी परकी आहेस. मी तुला ओळखत नाही. परंतु काय तू विश्वास करतेस की येशू ख्रिस्त काल, आज व युगानुयुग सारखाच आहे? काय तू विश्वास करतेस की तुझ्या मध्ये असलेला उच्चरक्तदाब तुझ्या मधून निघून जात आहे व तू बरी होणार आहेस? ह्याच गोष्टीसाठी तू प्रार्थना करीत होतीस.

पहा? विश्वास कर. तिने कोणाला स्पर्श केला काय? ती मला स्पर्श करू शकत नाही, ती तर तिथे दूर बसली आहे. तर तिने आपला महायाजक ह्याला आपल्या दुर्बलतेच्या अवस्थेत स्पर्श केला आहे.

263 फक्त विश्वास ठेवा. आता पहा, तुम्हाला इथे वर येण्याची गरज नाही. तुम्ही आपापल्या जागीच असा. फक्त विश्वास ठेवा, मी तुम्हाला त्या एका गोष्टीची विनंती करतो. फक्त विश्वास ठेवा.

264 आता तिथे एक स्त्री जी मागे बसलेली आहे, जी आता या बाजूनी वळून प्रार्थना करत आहे. ती आपल्या स्वतःसाठी प्रार्थना करीत नाही. ती आपल्या प्रिय व्यक्तीसाठी प्रार्थना करत आहे. कारण ते असा आहे...आता नुकताच एक स्त्री आपल्या प्रिय व्यक्ती म्हणजे तिच्या आईसाठी प्रार्थना करावयात आली होती. परंतु ही स्त्री आपल्या वडीलासाठी प्रार्थना करत आहे. आणि तिचा वडील, मी इथे एक उचंबळणाऱ्या समुद्र बघतोय, तो—तो—तो इथे नाहीये...तो दूरदेशी म्हणजे नॉर्वे मधला आहे. हो हे सत्य आहे. हे तरुण स्त्रीये, प्रभू येशू वर विश्वास ठेव आणि तुझा वडील बरा होईल.

आता तिने कोणाला स्पर्श केला? तिला विचारा, ती मला ओळखते काय.

265 काय याच गोष्टीसाठी तू प्रार्थना करीत होतीस? जर हे सत्य असेल तर आपले हात अशाप्रकारे झटक. हे सत्य आहे. आपण पण एक दुसऱ्यासाठी परके आहोत. काय हे सत्य आहे? हो हे सत्य आहे. तुला तुझी मागणी प्राप्त होईल जर तू विश्वास ठेवशील.

266 ती तर माझ्यापासून वीस गज दूर आहे, तिने कोणाला स्पर्श केला? तिने महा याजकाला स्पर्श केला, पहा, मला नाही. मी तिला ओळखत नाही. परंतु तिने महायाजकाला, आपल्या प्रेमळ प्रभू येशूला जो आपल्यामध्ये आजच्या रात्री उपस्थित आहे त्याला स्पर्श केला.

तू माझ्यासाठी परका आहेस. काय हाच तो रुग्ण आहे काय, हाच तो व्यक्ती आहे काय?

267 पहा, मला त्याच प्रकारे केले पाहिजे ज्या प्रकारे मला प्रेरणा मिळत आहे. ती स्त्री बघा, त्याने तिला स्पर्श केला. पहा तिने—तिने त्याच्या द्वारे देवाला स्पर्श केला. आता पहा, तिकडले लोक बघा, ते अश्याच प्रकारे करत आहेत, ते देवाला स्पर्श करीत आहेत. तुम्ही बघा...मला ज्या प्रकारे प्रेरणा मिळत आहे त्या प्रकारे करणे आहे...

268 आता, आपण एक दुसऱ्यासाठी परके आहोत. मी तुला ओळखत नाही. मी तुला माझ्या आयुष्यात कधी पाहिले नाही. आपण एक दुसऱ्यासाठी परके आहोत. हे यासाठी आहे की हे लोकांनी जाणावे की आपण एक दुसऱ्यांना ओळखत नाही. आता जर प्रभू येशू मला अशी कोणती गोष्ट प्रगट करील, जी तुला ठाऊक आहे पण मला ठाऊक नाही, तर ते दैवी सामर्थ्ययातूनच आलेले आहे. आता पहा, दैवी आरोग्य, जर तुला आरोग्य हवे असेल...मला ठाऊक नाही तुला काय हवय...पहा, काही वेळेला ते दुसऱ्यांसाठी असते, काही वेळेला घरगुती त्रास किंवा आर्थिक समस्या असते. परंतु तो सर्वकाही पुरवू शकतो. जर त्याला हे माहित असेल की तुम्हाला काय हवे आहे व तो जर मला ते प्रगट करील, पहा. आणि जेव्हा असं घडेल, तेव्हा तुम्हाला कळेल की हे त्यानेच केलं आहे. पहा, तुम्हाला ठाऊक आहे की हे तोच करू शकतो.

269 काय ह्या गोष्टी पाहून तरी तुम्ही विश्वास कराल काय? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.]. ठीक आहे, विश्वास ठेवा.

270 आता, ती एक चांगली व्यक्ती आहे. पहा? आता यासाठी आपण थोडा वेळ घेऊया.

271 आता ते इथून निघून गेले आहे, ते लोकांमध्ये गेले आहे. ते कोणाकडे तरी...तुम्ही भक्तिभावाने शांत रहा. ते एक विश्वासाचे महान आकर्षण आहे. ते योग्य आहे तिथेच जाते... काय तुम्हाला तो सद्गुण जाणवतो...मी आता येथे दीड तास प्रचार केला, आणि एक दृष्टांत मला दहा तासाच्या प्रचारापेक्षा जास्त थकवा देतो. ताकत, तो *सद्गुण* "ताकत" आहे.

272 पहा, तुम्ही ते करीत आहात. ते मी करीत नाही. मी नव्हे. हे दृष्टांत माझ्याकडून नाही. ते तुम्हा कडून आहे. तुमचा देवा मधला विश्वास हे घडवून आणत आहे. हे मी करीत नाही. मी नाही. मी येथे एका प्रतिनिधीच्या रुपात उपस्थित आहे. अशाप्रकारे माझ्यासमोर हे असलेला माईक, हे बोलू शकत नाही, हा स्पीकर, जोपर्यंत तिथे एक जिवंत आवाज नाही तिथपर्यंत ते आपणहून बोलू शकत नाही. तशाच प्रकारे मी देखील आपणहून काही बोलू शकत नाही. तो तो आहे, जो जीवंत आहे तो, ख्रिस्त, जो जीवंत आहे, तो बोलतो आणि त्याला ठाऊक आहे की तुम्ही कोण आहात आणि तुम्ही काय केले आहे.

273 आपण त्या स्त्रीकडे पुन्हा परत येऊया. जर प्रभू येशू मला तुझ्या जीवनाविषयी काही गोष्टी प्रकट करील...जी तुला त्याच्यापासून अपेक्षा आहे. कारण तू—तू एक विश्वासी असून त्याच्याकडून तुला काहीतरी अपेक्षा आहे. आणि आणि जर ती मला ते प्रकट करील तर काय तू त्यावर विश्वास ठेवशील? [ती भगिनी म्हणते, "हो"—सम्पा.] काय तू त्यावर विश्वास करशील? आता तुझा त्रास तुझ्या पोटा विषयी आहे. ["हो."] चिकित्सेने हे दाखवले आहे की तुझ्या पोटात व्याधी आहे. ["हो."] हे खरे आहे. काय हे सत्य आहे? ["हो."] आणि इथे आणखी गोष्टी त्या चिकित्सेतून प्रगट झाली ती म्हणजे तुझ्या पोटात गाठ आहे. ["हो."] काय हे सत्य आहे? ["हो."] काय तू विश्वास करतेस? ["हो."] काय तू विश्वास करतेस की देव मला तू कोण आहेस हे दाखवण्यास समर्थ आहे? ["हो."] श्रीमती विलियार्ड, तू आता विश्वास ठेव व घरी जा.

274 आता तुम्ही आपल्या हृदयाने विश्वास करता काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] आता त्या स्त्रीस तुम्ही विचारा. आम्ही एक दुसऱ्यांना कधी पाहिलं नाही. परंतु हे पवित्र आत्म्याचे काम आहे व तो इथे उपस्थित आहे. आता तुम्ही भक्तिभावाने शांत रहा. तुम्हाला त्यासाठी वेळ मिळाला तर मला सांगा...?...

275 आता श्रीमान तुम्ही कसे आहात? आता आम्ही एक दुसऱ्यांना परके आहोत. आणि आपल्याला याची जाणीव आहे की आपल्याला एक दिवस देवाला भेटायचं आहे. आणि आता आपण एक दुसऱ्यांना परके असताना, जर प्रभू येशू मला तुमच्या जीवनातील त्रास प्रगट करील, तर काय तुम्ही त्यावर विश्वास ठेवाल? आणि तुम्हाला ठाऊक आहे की मी एक मनुष्य असल्याकारणाने मला ते माहीत नाही. परंतु जर तो असेल तर हे शक्य आहे. काय हे सत्य आहे?

276 मला हे बोलताना अत्यंत दु: ख वाटत आहे. हा मुलगा छायांकित आहे, पहा, ह्याच्या भोवती अंधकार आहे. आणि त्याच्या—त्याच्या मध्ये काहीतरी गंभीररीत्या चुकीचे आहे. तुला कर्करोग आहे. हे बरोबर आहे. आणि क्ष-किरण द्वारे हे दाखवून हे प्रगट झाले आहे की तुझ्या पोटात कर्करोग आहे, आणि तो पोटाच्या बाहेरील बाजूस आहे. तो इथे आहे... काय हे सत्य आहे? त्याच जागेवर मी क्ष-किरणाचे छायाचित्र पाहत आहे. तो पोटाच्या बाहेरील बाजूस आहे. आता याच्या अर्थ असा आहे की तुझे जाणे लवकरच आहे, जर असं नसेल तर देव तुला सहाय्य करो. माझ्या बंधू, काय ह्याचा स्वीकार करतोस? येशू पुढे... येशू पुढे कर्करोग काहीच नाही, तो एखाद्या डोकेदुखी प्रमाणे आहे. काय तू हे विश्वास करतोस? आता तुझ्या मध्ये काहीतरी घडले आहे. तुला आता चांगल्या संवेदना होत आहे, पहा? आता जर तू अशाच प्रकारे विश्वास ठेवत राहशील तर, ती छाया तुझ्या

बाजूची निघून गेली आहे. पहा? तुझ्या विश्वासाने तुला वाचविले आहे. आता तू विश्वास ठेवत जा, देव तुला बरे करील.

277 देव संधिवात देखील बरा करू शकतो. काय तु ह्यावर विश्वास ठेवतोस? [तो रुग्ण म्हणतो "आमेन."—सम्पा.] तर आता तू चालू लाग व म्हण, "प्रभू येशू, मी तुझा आभारी आहे."

278 "जर तू विश्वास ठेवशील. विश्वास ठेवणार—ठेवणारयांना सर्व काही शक्य आहे." ठीक आहे.

279 जेव्हा मी "संधिवात" हा शब्द म्हणालो तेव्हा मला एक विचित्र संवेदना जाणवली. जेव्हा हा रोग तुम्हाला होतो, जेव्हा तुम्ही सकाळी उठू शकत नाही, हे तुम्हाला पूर्णपणे कडक करते. ते आता निघून गेले आहे, जर तू तसा विश्वास ठेवशील. आता जा आणि विश्वास ठेव. प्रभू तुम्हाला आशीर्वादित करो. फक्त विश्वास ठेवा.

280 आता तुम्ही पाहता दम्याचा रोग. काय तू विश्वास करतोस की देव ते बरे करण्यास समर्थ आहे? [तो रुग्ण म्हणतो, "आमेन."—सम्पा.]. त्याचा स्वीकार कर, जा आणि येशू ख्रिस्त तुला बरे करो, आणि आपल्या पूर्ण हृदयाने विश्वास कर.

281 काय तुला जाऊन आपल्या जेवणाचा आनंद घ्यायचा आहे. तुझे पोटाचे दुखणे निघून गेले आहे, जा आणि बरा हो. जा आणि विश्वास कर. जर तू विश्वास ठेवशील!

282 देव पाठीचे दुखणे व इतर सर्व बरे करू शकतो. काय तू त्यावर विश्वास ठेवतोस? काय तू विश्वास करतो की तो तुला बरे करू शकतो? तू आपल्या मार्गाने जा, आनंद कर व म्हण, "प्रभू मी तुझा आभारी आहे."

283 काय तू विश्वास करतेस की मी त्याचा संदेष्टा किंवा त्याचा दास आहे? काय तू विश्वास करतेस की देव तुझा हृदयाचा आजार बरा करू शकतो? तर जा आणि विश्वास ठेव.

284 आता हे स्त्रिये, तुला एकतर स्त्रीरोग व संधिवात आहे. काय हे सत्य आहे? काय तू विश्वास करतेस की तो दैवी आरोग्य दाता आहे? त्याला तू आपला आरोग्य दाता म्हणून स्वीकार. आनंद करीत जा आणि म्हण, "प्रभू मी तुझी आभारी आहे."

285 आता हे स्त्रिये, तू खूप काळापासून स्त्री रोगाने त्रस्त आहेस. तुला हृदय विकार देखील आहे. त्या विकारांमुळे तू आता मरणारच होती. तुझे हृदयाचे ठोके हळू पडत आहे. आपल्या पूर्ण हृदयाने विश्वास ठेव आणि ते यापुढे तुला त्रास देणार नाही. जा आणि विश्वास ठेव.

286 तुला रक्ताचा विकार आहे. काय तू विश्वास करतेस की देव रक्त निर्माण करू शकतो, तो रक्ताची कमतरता भरून काढून त्याला बरे करू शकतो? काय तू विश्वास करतेस? ठीक आहे, विश्वास करत जा, तो मधुमेह तुला आणखी त्रास देणार नाही. तू पूर्ण हृदयाने ह्यावर विश्वास ठेव.

287 काय तू विश्वास करतोस, की त्याने तुला तेथे बसलेला असताना आरोग्य दिले आहे? काय तू हृदयाने विश्वास करतोस? विश्वास ठेव, की देवाने तुला पूर्णपणे बरे केले आहे, पूर्णपणे? देव तुला आशीर्वाद देवो. तू आपल्या मार्गाने जाऊन आनंद कर. आमेन.

288 ती पाठदुखी तुला यापुढे आणखी त्रास देणार नाही, आता तुला खूपच चांगले वाटेल, नाही काय? ठीक आहे, आनंद करीत जाऊन म्हण, "प्रभू येशू मी तुझा आभारी आहे." आणि पूर्ण हृदयाने ह्यावर विश्वास ठेव.

289 तुझे रक्त, खूपच पातळ आहे. तुला मधुमेह आहे. काय तू विश्वास करतेस की देव मधुमेह बरा करू शकतो? चला आपण रक्त भरण्यासाठी कलवरी कडे जाऊ या. तो विकार तो तुझ्यापासून दूर करील.

290 तुला छातीचा विकार आहे. नाही काय? तुला काही वेळे अगोदर बोलणार होतो. काही क्षणा अगोदर तू माझ्याकडे बघत होतास, आणि मी वळून तुझ्याकडे पाहिले, आणि तू माझ्या डोळ्यात बघून खाली पाहू लागला, तेव्हा तुला एक विचित्र प्रकारची संवेदना जाणवली, तेव्हाच छातीचा विकार तुला सोडून गेला. तो निघाला आहे. एका नसेच्या आजारामुळे तुला हा छातीचा विकार जडला होता. तू विश्वास करतोस.

291 जो तू तेथे खुर्चीच्या पुढल्या बाजूस बसला आहेस, ज्या तुला संधिवात आहे, तुला काय वाटते, काय तू विश्वास करतोस? उभा राहा, येशू ख्रिस्त तुला बरे करीत आहे.

292 मी तुम्हा सर्वांना देवावर, येशू ख्रिस्तावर जो काल, आज व युगानुयुग सारखा आहे त्यावर विश्वास ठेवण्यास आवाहन करतो. काय तुम्ही त्यावर विश्वास करता? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] ठीक आहे. जर तुम्ही आपल्या पूर्ण हृदयाने विश्वास करीत आहात तर तुम्ही एकमेकावर आपला हात ठेवा. तो कधी पडू शकत नाही. तो आपला देव, प्रेमळ प्रभू येशू आहे, त्याच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्य द्वारे, त्याचे प्रकट करण्याद्वारे. तुम्ही एकमेकावर आपला हात ठेवा.

293 स्वर्गीय पित्या, तो शत्रू पळून गेला आहे. शत्रु हरला आहे. येशू ख्रिस्त जिवंत असून राज्य करत आहे. हे देवा, आम्हावर दया करून या सर्व लोकांना आरोग्य प्रदान कर.

294 हे सैताना, तू युद्ध हरला आहेस! येशू ख्रिस्त आजच्या रात्री या सभास्थानामध्ये विजयी झाला आहे. तू उघडा पडला आहेस. तू एक खोटारडा आहेस. आणि आम्ही तुला हात धरून बाहेर बोलावीत आहो, त्या कलवरी वरच्या प्रेमा द्वारे. येशू ख्रिस्ताच्या नावात ह्या लोकांतून बाहेर निघ व त्यांना मोकळे सोड.

**ह्या काळाचे चिन्ह** MAR63-1113

(The Sign Of This Time)

हा संदेश, भाऊ विल्यम मेरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, बुधवारी संध्याकाळी, 13 नोव्हेंबर, 1963 साली, मार्क बॉलरूम, न्यूयॉर्क, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## <u>छपाईच्या हक्काची सूचना</u>

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org